AROTE Dental Clinic
smile more..live more..
डॉ. सौ. स्वप्नाली अतुल आरोटे (तांबे)
B.D.S. (Dental Surgeon) Reg.No.: A-17501
दंतरोग तज्ञ
वेळ : सकाळी १० ते दुपारी १ व संध्याकाळी ५ ते ८
उपलब्ध उपचार
* रुट कॅनॉल ट्रीटमेंट
* हिरड्यांवरील उपचार व शस्त्रक्रिया
* वेडेवाकडे दात सरळ करण्याचे उपचार
* दात व जबड्यांवरील शस्त्रक्रिया
* कृत्रिम दंतरोपण शस्त्रक्रिया
* लहान मुलांच्या दातांवरील उपचार
पत्ता : ओम शांती बिल्डिंग, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि.अ.नगर
फोन : (०२४२५)२२२३४३

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026
शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५

दशरथ चव्हाण
मॅनेजिंग डायरेक्टर
आदर्श इंजिनिअरिंग सर्विसेस
जनरेटर विक्री व दुरुस्ती
१५ के व्ही ए पासुन २००० के व्ही ए
Mumbai off.: 203, Kokn Apt., Plot No. 1053,Sector - 5 Land Mark Mayur Bar Hotel, KoparKhairane, Navi Mumbai 400 709.
Mob.: +91-8286562340 / 9004511593/8652653990 /8286562350
Pune Off.: At Post Vadaj, Taluka Junnar, Dist.- 410 502
Email: dasharathschavan@gmail.com Website: www. adarshengineering.net

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०२८ | किंमत : ४ रूपये | Gmail : aklgavakari@gmail.com Gmail : punegavkari@gmail.com




# मुंबईतील अनधिकृत फेरीवाल्यांना हटवा

## विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांचे राज्य सरकारला निर्देश

नागपूर : (समर्थ गांवकरी)



मुंबईतील अनधिकृत फेरीवाल्यांना हटविण्याचे महत्वपूर्ण निर्देश विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी गुरुवारी राज्य सरकारला दिले. मुंबईतील वर्दळीच्या २० ठिकाणी फेरीवाल्यांना परवानगी देवू नये, असे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असून त्या ठिकाणी असलेल्या पात्र फेरीवाल्यांना महापालिकेने पर्यायी जागा उपलब्ध करुन द्यावी, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

यासंदर्भात अमीन पटेल, विजय वडेट्टीवार आदींनी विधानसभेत लक्षवेधी सूचना मांडली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या स्वनिधी योजनेतून फेरीवाल्यांना कर्जे देण्यात आली आहेत आणि या फेरीवाल्यांना आता महापालिका आणि पोलिस हटवीत आहेत. ही कारवाई अन्याय्य असून ती त्वरित थांबवावी, अशी मागणी पटेल यांनी केली. मुंबईतील सर्वजण मॉलमध्ये खरेदी करु शकत नाहीत आणि हे फेरीवाल सर्वसामान्य नागरिक आहेत. सीएसएमटी ते दहिसरपर्यंत सर्व ठिकाणी फेरीवाले असून त्यांना फेरीवाला विभागात जागा द्यावी, असे त्यांनी सभागृहात सांगितले.

राज्य सरकारची भूमिका मांडताना उद्योग मंत्री उदय सामंत म्हणाले, केंद्र सरकारन राष्ट्रीय फेरीवाला धोरण २००९ मध्ये आणले असून राज्य सरकारनेही २०१६ मध्ये फेरीवाला धोरण आणले होते. फेरीवाल्यांकडून २०१४ मध्ये सर्वेक्षण करण्यासाठी अर्ज मागविण्यात आले होते. त्यावेळी ९९४३५ अर्ज आले व त्यापैकी ३२१४५ पात्र ठरले. काही फेरीवाले उच्च न्यायालयात गेले असून त्यांची याचिका अद्याप प्रलंबित आहे. तेथे ज्येष्ठ वकील देवून सरकार फेरीवाल्यांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करील.

काही सदस्यांनी आपले मुद्दे मांडल्यावर पात्र फेरीवाल्यांना पालिकेने हटवू नये, उच्च न्यायालयाने ज्या २० ठिकाणच्या फेरीवाल्यांना हटविण्याचे आदेश दिले आहेत, त्याचा अवमान न करता तेथील पात्र फेरीवाल्यांना पर्यायी जागा द्याव्यात आणि इतर अनधिकृत फेरीवाल्यांवर पालिकेने कारवाई करावी, असे अध्यक्ष नार्वेकर यांनी स्पष्ट केले. त्यानुसार राज्य सरकार पालिका आयुक्तांना निर्देश देईल, असे सामंत यांनी सभागृहात सांगितले.

## थोडक्यात...

### 17 पुरातन पाणपोयांची दुरुस्ती करणार

मुंबई (समर्थ गांवकरी) : कुठेही बाहेर असताना तहान लागली तर पाण्याची बाटली आपण विकत घेतो. पण एकेकाळी ही सोय नव्हती, तेव्हा मात्र रस्त्यावर बांधलेल्या पाणपोया अर्थात प्याऊशिवाय पर्याय नवहृता. मुंबईत दीडशे, दोनशे वर्षांपूर्वी ब्रिटिशांनी आणि त्याकाळातील श्रीमंतांनी बांधलेल्या देखण्या पाणपोया आता दूरवस्थेत आहेत. पुरातन दर्जाच्या या पाणपोयांची डागडुजी करून मुंबईची पुरातन कला आणि फुकट पाणी देण्याची संस्कृती जपण्याचे पालिकेने ठरवले आहे. त्या अंतर्गत 17 पुरातन पाणपोयांची दुरुस्ती करण्यात येणार असून त्याकरीता मुंबई महापालिकेने निविदा मागवल्या आहेत. या कामासाठी सुमारे 16 कोटी रुपये खर्च अंदाजित आहे.

## महानगर क्षेत्रातील मलनि:स्सारणाच्या कामांना गती; १ हजार २०९ कोटींची मान्यता

पुणे: (समर्थ गांवकरी)



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) क्षेत्रातील नागरी विकास केंद्रात मलनि:स्सारण योजना राबविण्यात येणार असून २७ गावांमधील १ हजार २०९ कोटींच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे. यामुळे २७ गावातील ३९ लाख ४२ हजार लोकसंख्येला फायदा होणार आहे. पीएमआरडीएची १३ वी सभा गुरुवारी विधानभवातील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी या कामांना मंजुरी देण्यात आली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता,अपर मुख्य सचिव (नगर विकास) असीम कुमार गुप्ता उपस्थित होते. पुणे महानगर आयुक्त डॉ. योगेश म्हसे यांनी बैठकीत सादरीकरण केले. विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार , पुणे महापालिका आयुक्त नवल किशोर राम, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी दूरदृष्टी प्रणाली द्वारे उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,' प्राधिकरणाकडे अग्निशमन सेवा शुल्कापोटी शिल्लक ३०० कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग अग्नि प्रतिबंधक आराखड्यानुसार विविध उपाययोजनांसाठी करण्यात येणार आहे.

## झीशान सिद्दीकी यांची सुरक्षा कमी करण्यामागे विशिष्ट हेतू

### उच्च न्यायालयाचे सकृतदर्शनी मत

मुंबई : (समर्थ गांवकरी)



माजी आमदार बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर त्यांचा मुलगा झीशान यांच्या सुरक्षेत कपात करण्यात आल्याचे कारण उघड न केल्यावर उच्च न्यायालयाने गुरुवारी बोट ठेवले. तसेच, झीशान यांची सुरक्षा कपात करण्यामागे विशिष्ट हेतू असल्याचे सकृतदर्शनी दिसून येत असल्याचे निरीक्षण नोंदवले.

वडिलांच्या हत्येनंतर आपल्या जीवालाही धोका असल्याची भीती व्यक्त करून झीशान यांनी पोलीस संरक्षणाची मागणी केली. त्यांना ते उपलब्धही करण्यात आले. तथापि, त्यांच्या आईने सिद्दीकी हत्या प्रकरणाच्या तपासावर नाराजी व्यक्त करून प्रकरण अन्य तपास यंत्रणेकडे सोपवण्यासाठी उच्च न्यायालयात याचिका केली. त्यानंतर झीशान यांच्या सुरक्षेत कपात करण्यात आली, असे वकील प्रदीप घरत यांनी खंडपीठाला सांगितले. त्याची दखल घेऊन झीशान यांच्या संरक्षणात कपात करण्याचा निर्णय घेण्यात आलेल्या बैठकीचा इतिवृतांत सादर करण्याचे आदेशही न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती रणजित भोसले यांच्या खंडपीठाने न्यायालयाला दिले.

त्यानुसार, सरकारी वकील मनकुँवर देशमुख यांनी झीशान यांच्याबाबतचा पोलिसांचा संभाव्य धोका मूल्यांकन अहवाल न्यायालयात सादर केला. त्यात संबंधित समितीतर्फे एखाद्या व्यक्तींना पोलीस सुरक्षा पुरवणे, कमी करणे, काढून घेणे याबाबतचा निर्णय घेतला जात असल्याचे नमूद केले होते. शेहझीन सिद्दीकी यांनी याचिका दाखल केल्यानंतर झीशान यांच्या सुरक्षेत कपात केल्याबाबत केलेल्या आरोपांचेही सरकारी वकिलांनी खंडन केले. सुरक्षा अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी समितीची महिन्यातून एकदा बैठक होते.

प्रत्येकवेळी प्रत्येकाची बाजू ऐकणे शक्य नसते. त्यामुळे सुरक्षा पुरविण्याच्या प्रक्रियेला दोन-तीन महिने लागू शकतात. कधीकधी (धोक्याच्या मूल्यांकनानुसार) एका दिवसातही निर्णय घेतला जातो, असेही देशमुख यांनी सांगितले. त्यावर, समिती आहे तर तिने प्रत्येकाला भेटूनच निर्णय घेतला पाहिजे. सुरक्षा कमी करण्याचा निर्णय घेतलेल्या बैठकीचे इतिवृत्त आम्हाला दाखवा. त्याची कायदेशीरता दाखवा.









# नागपूर : 'दैनिक समर्थ गांवकरी' दिवाळी अंकाचे प्रकाशन













**नागपूर : (समर्थ गांवकरी)**

नागपूर येथे 'दैनिक समर्थ गावकरी' दिवाळी अंकाचा भव्य प्रकाशन सोहळा राज्यातील मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला. सामाजिक भान, ग्रामीण विकास आणि प्रबोधनात्मक लेखनासाठी ओळख असलेल्या या दिवाळी अंकाच्या प्रकाशनाने नागपूरच्या साहित्यिक व पत्रकारितेच्या वातावरणात नवचैतन्य निर्माण केले. प्रकाशन सोहळ्यास महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, महसूल मंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे, उद्योग मंत्री ना. उदय सामंत, औषध निर्माण मंत्री ना. नरहरी झिरवाळ, आमदार अमोल खताळ, आमदार विठ्ठलराव लंघे तसेच सुषमा अंधारे हे मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र राज्याचे माहिती महासंचालक ब्रिजेश सिंग मिश्रा यांनीही विशेष उपस्थिती लावली. कार्यक्रमाला पत्रकार संघटनांच्या उच्च पदाधिकाऱ्यांचीही उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएशन दिल्लीचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे, राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भोकरे, दैनिक समर्थ गावकरीचे संपादक व राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख भाऊसाहेब वाकचौरे, विदर्भ प्रमुख अनुप भार्गव, प्रदीप शेंडे, तसेच दैनिकाचे महाव्यवस्थापक संजय फुलसुंदर हे सर्व मान्यवर या सोहळ्यात सहभागी झाले. दिवाळी अंकामध्ये ग्रामीण विकास, शेती, सामाजिक परिवर्तन, जलव्यवस्थापन, उद्योगक्षेत्र, सांस्कृतिक वारसा आणि समकालीन विषयांवर लेखनाचा समृद्ध असा संग्रह वाचकांसमोर आणण्यात आला आहे. प्रकाशनानंतर झालेल्या चर्चासत्रात मंत्री, पत्रकार आणि संपादकांनी ग्रामीण पत्रकारितेचे वाढते महत्त्व, शासन–माध्यम समन्वय आणि मूल्याधिष्ठित पत्रकारितेची गरज यावर आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन आणि संयोजनामुळे 'दैनिक समर्थ गावकरी' दिवाळी अंकाचा सोहळा यंदा विशेष गाजला.




## बारा वर्षांच्या संघर्षानंतर वीज कंत्राटी कामगारांना न्याय

### औद्योगिक न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय

- महावितरणमधील सर्व कंत्राटी कामगारांना कायम कामगार म्हणून मान्यता.
- २०१२ ते आजपर्यंतचा वेतनफरक, भत्ते आणि सर्व शासकीय लाभ देण्याचे आदेश.
- लाभ सहा महिन्यांत न दिल्यास, प्रलंबित रकमेवर ५% व्याज देणे बंधनकारक.
- महावितरणमधील कंत्राटदार व्यवस्था नाममात्र व बनावट असल्याचे न्यायालयाचे निरीक्षण.

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीतील २२८५ कंत्राटी कामगारांना कायम सेवेत सामावून घ्यावे असा ऐतिहासिक निर्णय औद्योगिक न्यायालय, ठाणे येथे न्यायाधीश एस. झेड. सोनभद्रे यांनी दिला असून, बारा वर्षांच्या प्रदीर्घ लढ्याला मिळालेले हे यश असल्याची माहिती महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघाचे जिल्हा सचिव सचिन पाटील यांनी दिली. सन २०१२ पासून कंत्राटी कामगारांना कायमस्वरूपी सेवेत घ्यावे यासाठी भारतीय मजदूर संघाशी संलग्न महाराष्ट्र वीज कामगार महासंघ व महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार महासंघ सातत्याने प्रयत्नशील होते. त्या काळात महासंघाचे तात्कालीन अध्यक्ष अण्णाजी देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली, महासंघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. उच्च न्यायालयाने हे प्रकरण औद्योगिक न्यायालयाकडे वर्ग केले. या दीर्घकालीन न्याय लढ्यात अनेक अडथळे, सुनावण्या, पुरावे व कायदेशीर प्रक्रिया पार पडल्यानंतर अखेर कामगारांना न्याय मिळाला. संघटनेतर्फे ज्येष्ठ विधीतज्ज्ञ विजय वैद्य, अॅड. बाळासाहेब देसाई, अॅड. शिरीष राणे यांनी कामगारांची बाजू भक्कमपणे मांडली, तर व्यवस्थापनाच्या वतीने अॅड. एल. आर. मोहिते यांनी काम पाहिले. या ऐतिहासिक निकालाचा फायदा अहिल्यानगर जिल्ह्यातील ५५ कामगारांसह राज्यभरातील सर्व कंत्राटी कामगारांना होणार असून, कंत्राटदारांकडून होणारी पिळवणूक थांबण्यास मोठी मदत मिळणार आहे. निकाल जाहीर होताच जिल्ह्यातील अनेक वीज कार्यालयांसमोर पेढे वाटून, फटाके फोडून कंत्राटी कामगारांनी आनंद व्यक्त केला.

## भोकरचा कर्मचारी ठार !

**अर्धापूर : (समर्थ गांवकरी)**



स्कुटीने वसमत कडे जात असताना पाठीमागून येणाऱ्या आयशर गाडीने जोरदार धडक दिल्याने या अपघातात एक ठार,एक गंभीर जखमी झाल्याची घटना दि.९ मंगळवारी रोजी रात्री ७-४० वा.घडली असल्याची माहिती महामार्ग पोलीसांनी दिली आहे. भोकर न्यायालयाचे लघुलेखक कर्मचारी मंदार मनोज मालवतकर व त्याचा मित्र मंगेश प्रकाश दमानी हे दोघेजण स्कुटीने वसमत कडे जात होते. पाठीमागून येणारे आयचर क्र. एम.एच.४८- टी.६३०५ च्या चालकाने स्कुटीला जोरदार धडक दिल्याने या अपघातात मंदार मनोज मालवतकर हे गंभीर जखमी झाली होती. त्यांना महामार्गाच्या रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालय नांदेड येथे उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर या अपघातात मंगेश प्रकाश दमानी रा.दोघेही वसमत यांच्यावर नांदेड येथील खाजगी रुग्णालयात उपचारार सुरू आल्याची माहिती महामार्ग पोलीसांनी दिली आहे.

## समाजसुधारक बाबा आढाव चळवळीचा अखंड ऊर्जा स्त्रोत : डॉ. गौतम दुथडे

### वसंतराव नाईक महाविद्यालयात श्रद्धांजली कार्यक्रम

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

थोर सत्यशोधकी विचारवंत दिवंगत बाबा आढाव हे फुले-शाहू-आंबेडकरी चळवळीचा अखंड ऊर्जा स्त्रोत होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा परिवर्तनवादी विचारवंत प्रा. डॉ. गौतम दुथडे यांनी केले. श्री सेवादास शिक्षण प्रसारक मंडळाच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात थोर सत्यशोधकी समाजसुधारक दिवंगत बाबा आढाव यांना श्रद्धांजली अर्पण कार्यक्रम घेण्यात आला, या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शेखर घुंगरवार होते तर उपप्राचार्य डॉ. व्ही. आर. राठोड, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एन. पी. दिंडे आणि आर. डी. राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतांना डॉ. दुथडे म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले, छत्रपती शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्य आणि विचाराचा आदर्श



बाबा आढाव यांनी आयुष्यभर आपल्या आयुष्यात जोपासला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतर आंदोलनात त्यांचे अमूल्य योगदान राहिले. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न, ऑटो चालक, बांधकाम क्षेत्रातील श्रमिक यांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळावी यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर बाबा आढाव यांनी 'एक गाव एक पाणवठा' हा उपक्रम खेड्यापाड्यापर्यंत पोहोचवला. विषमताग्रस्त समाजातील जातीयता, अस्पृश्यता संपवण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले.

बाबा आढाव हे नामांकित आयुर्वेदिक डॉक्टर होते. त्यांनी समाजवादी पक्षातही काही काळ कार्य केले. २०१२ मध्ये कामगारांच्या पेन्शनसाठी त्यांनी मोठे आंदोलन उभे केले होते.

# शरदचंद्रजी पवार : लोकांच्या मनावर राज्य करणारे दूरदृष्टीचे धनी!

### डॉ. विश्वासराव आरोटे कळसुबाई शिखरावरून

**: (समर्थ गांवकरी)**

भारतीय राजकारणातील अनुभवी, प्रगल्भ, संतुलित आणि दूरदृष्टीचा वारसा जपणारे राष्ट्रनेते माननीय शरदचंद्रजी पवार हे महाराष्ट्राच्या जनमानसात 'जाणता राजा' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील प्रदीर्घ कारकिर्दीने देशातील नेतृत्वाला नवे दिशादर्शन दिले. जमिनीशी घट्ट नातं, सर्वसामान्यांशी थेट संवाद, संकटसमयी लोकांच्या मदतीला धावून जाण्याची वृत्ती आणि प्रशासनावर प्रचंड पकड, या प्रत्येक गुणामुळे पवार साहेबांचा नेतृत्वाचा कणा लोखंडाएवढा भक्कम बनला.

त्यांच्या वाढदिवसानिमित्त आज संपूर्ण महाराष्ट्रातील असंख्य नागरिक कृतज्ञतेने त्यांचे स्मरण करतात. असा नेता वारंवार जन्माला येत नाही; म्हणूनच ते जाणता राजा.

जाणता राजा – लोकांशी असलेले अढळ नाते!

शरद पवार लोकांशी बोलतात ते समोरच्या व्यक्तीचा दर्जा पाहून नाही, तर मानवतावादी दृष्टिकोनातून.

शेतकरी असो की मजूर, विद्यार्थी असो की वृद्ध, प्रत्येकाशी तितक्याच आपुलकीने संवाद.

ग्रामीण भागातील कार्यक्रमात असो वा मोठ्या राजकीय व्यासपीठावर, लोकांच्या समस्या ते तितक्याच गंभीरतेने ऐकतात.

एखादा तरुण कार्यकर्ता अचानक भेटला तरी त्याचे नाव लक्षात ठेवण्याची, त्याचा प्रश्न विचारून तो सोडवण्याची पवार यांची खास शैली आजही कायम आहे.

यामुळेच महाराष्ट्रातील प्रत्येक गावात, प्रत्येक समाजघटकात पवार साहेबांविषयी अपार आदर आहे.

संकटातही स्थिरबुद्धी – 'जाणता राजा'ची खरी ओळख!

नेतृत्वाची खरी परीक्षा संकटकाळात होते. पवार साहेबांनी अनेकदा हे सिद्ध केले आहे. लातूर-उस्मानाबाद भूकंप – प्रत्यक्ष गावागावात जाऊन पुनर्वसन कार्याची सूत्रे हातात घेतली. दुष्काळी भागांमध्ये पाणी प्रकल्प – जलसिंचन, बंधारे, पाणी



उचल योजनेचे सक्षम नियोजन. पूर, महामारी, शेतकरी संकट – प्रत्येक ठिकाणी त्वरित मदत, तातडीचे निर्णय आणि प्रशासकीय यंत्रणेला वेग. लोकांच्या संकटात धावून जाणारा नेता, ही 'जाणता राजा'ची शुद्ध व्याख्या आहे आणि ती पवार साहेबांनी आयुष्यभर जगली. सहकार चळवळ ही महाराष्ट्राच्या प्रगतीची शान आहे. या चळवळीला नवसंजीवनी देणारे नेते म्हणजे शरद पवार. सहकारी साखर कारखान्यांचे जाळे उभे करण्याची दूरदृष्टी, शेतकरी उत्पादन संघटनांचे बळकटीकरण, ग्रामीण बँकिंग प्रणाली सक्षम करणे, महिलांच्या बचतगटांना चालना, दुधाच्या व्यवसायाचे आधुनिकीकरण, यामुळे सहकार चळवळ आजही ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारताच्या कृषीक्षेत्राला वैज्ञानिक दृष्टी देणारे नेतृत्व म्हणजे पवार साहेब. आधुनिक शेतीचे तंत्रज्ञान भारतात आणणे, पिक विमा योजनांमध्ये सुधारणा, राष्ट्रीय कृषी विकास योजना, अन्नधान्य साठवणूक आणि निर्यात धोरणांचे आधुनिकीकरण, शेतकऱ्यांच्या प्रश्नांना राष्ट्रीय पातळीवर न्याय मिळवून देण्याची ठाम भूमिका, त्यांच्या कार्यकाळात भारताच्या कृषीक्षेत्राला नवी ओळख मिळाली. शरद पवार यांचे राजकीय आयुष्य हे रणनीती, दूरदृष्टी, समन्वय आणि संवाद या चार स्तंभांवर उभे आहे. तरुण वयातच मुख्यमंत्री पद, राष्ट्रवादी काँग्रेससारख्या मजबूत पक्षाची स्थापना, केंद्रीय स्तरावर संरक्षण, कृषी, नागरी पुरवठा अशा महत्त्वाच्या खात्यांची जबाबदारी, विविध राजकीय पक्षांशी संवाद आणि राज्यकर्त्यांचे समीकरण समतोल राखण्याची कला. पवार हे राजकारणातील राजनीती आणि व्यवहारिकता यांचे उत्तम मिश्रण आहेत. तरुणांना शरद पवार हे केवळ नेता वाटत नाहीत, ते एक मार्गदर्शक विद्यापीठ वाटतात. कठीण प्रसंगी शांत राहून निर्णय घेण्याचे कौशल्य, सतत शिकण्याची वृत्ती, मोठ्या प्रमाणात कामकाज करतानाही व्यावहारिक दृष्टिकोन, राजकारणात संयमाचे महत्त्व, लोकांच्या प्रश्नांशी नाळ जुळलेली ठेवण्याची शैली, ही सर्व तत्त्वे तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. शरद पवार यांच्या व्यक्तिमत्त्वात असे अनेक गुण आहेत जे त्यांना 'जाणता राजा' म्हणून ओळख मिळवून देतात:

स्थिर, दृढ, धीरगंभीर नेतृत्व,
अनुभवाची प्रचंड संपत्ती,
लोकांना जोडून घेणारी शैली,
परिणामकारक निर्णयक्षमता,
प्रशासकीय यंत्रणेवरील पकड,
समतोल, आपुलकी आणि
सदैव जनकल्याणाची भावना.

म्हणूनच ते आजही महाराष्ट्रातील जनतेच्या मनाच्या सिंहासनावर विराजमान आहेत. जाणता राजा शरद पवार यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा ! आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त— त्यांच्या दीर्घ, प्रदीर्घ आणि लोकसेवेच्या अविरत प्रवासाला कृतज्ञतेने अभिवादन.

त्यांचे आरोग्य, शक्ती आणि जनतेशी असलेले नाते सदैव मजबूत राहो—याच शुभेच्छा.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)

# वाहनाच्या धडकेत बिबट्याचा मृत्यू

## अहिल्यानगर - सोलापूर महामार्गावरील पाटेवाडी फाट्यावरील घटना ; बिबट्याला पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी



**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुक्यातील पाटेवाडी फाट्याजवळ अहिल्यानगर - सोलापूर महामार्गावर गुरूवार दि.११ डिसेंबर रोजी पहाटेच्या सुमारास रस्ता ओलांडणाऱ्या बिबट्याला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने बिबट्याचा गंभीर जखमी होऊन जागीच मृत्यू झाला आहे. ही घटना गुरुवारी सकाळी स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात आली. या दरम्यान, पाटेवाडी फाट्यावर बिबट्याला उडवल्याची बातमी गावात पसरल्यानंतर घटनास्थळी बिबट्याला पाहण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. यामुळे मार्गावर काही काळासाठी वाहतूक खोळंबली होती.

कर्जत तालुका आणि परिसरात मागील काही दिवसांपासून बिबट्या आला असल्याचे अफवा पसरवल्या जात होत्या.

तालुक्यातील अनेक भागात बिबट्याची दहशत राहिल्याने या भागातील नागरिक बिबट्याच्या दहशतीमुळे भयभीत झाले होते. मात्र, आज नगर - सोलापूर हायवे रोडवर बिबट्या वावरताना त्याला अज्ञात वाहनाने जोराची धडक दिल्याने या भागात बिबट्याचा वावर होता, हे स्पष्ट झाले आहे.

आणि परिसरात बिबट्या आला होता. या अफवांना बिबट्याच्या मृत्यूने पूर्णविराम मिळाला आहे. परंतु सध्या परिसरात भितीचे वातावरण ही निर्माण झाले आहे. या भागात मृत्यू बिबट्यासह आणखीन बिबटे परिसरात असल्याची शंका ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

आणि म्हणून सध्यातरी भितीचे वातावरण दिसत आहे.

घटनास्थळी वनविभागाने अन्य नागरिकांच्या मदतीने मृत बिबट्याला ताब्यात घेतले. अपघातातील मृत बिबट्या हा अंदाजे एक ते दीड वर्षे वयाचा आणि नर जातीचा होता. त्याचे शवविच्छेदन करीत दहन करण्यात आल्याचे वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडुन सांगण्यात आले.

सदर कार्यवाही वनपरिक्षेत्र अधिकारी मोहन शेळके यांच्या मार्गदर्शनात वनपाल प्रविण सोनवणे, वनरक्षक सुरेश भोसले, किसन नजन, विठ्ठल जानगवळी, ऋक्षिकेश लोखंडे यांनी केली.

# शाळा बंद आंदोलनाच्या दिवसाचा पगार कपात होणार नाही

- शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांचे विधासभेत उत्तर
- ज्ञानेश्वर माऊली शिक्षकांची सावली हे ब्रीद सत्य करणारे कोकण विभाग शिक्षक आमदार आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या अधिवेशनातील सभागृहात मांडलेल्या प्रश्नाला यश





**ठाणे:कल्याण : (समर्थ गांवकरी)**

दिनांक 5 डिसेंबर 2025 रोजी महाराष्ट्र राज्यातील संस्था मुख्याध्यापक, शिक्षक * -शिक्षकेतर संघटनांनी विविध मागण्यांसाठी शाळा बंद आंदोलन केले होते. यावर शिक्षण संचालक यांनी शिक्षक शिक्षकेतरांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचे आदेश काढले होते, त्याकरता आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे सर यांनी आज हिवाळी अधिवेशन मध्ये विधिमंडळ प्रश्न उपस्थित करून, पगार कपात करू नये, अशी मागणी केली तसेच शाळा बंद असलेल्या दिवसाला आम्ही सुट्टीच्या दिवशी कामकाज भरून काढू व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही त्यामुळे पगार कपात करू नये अशी विनंती केली त्यानुसार शालेय शिक्षण विभागाचे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पगार कपातीचा आदेश रद्द केला जाईल असे उत्तर दिले. अशी माहिती महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटनेचे कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे यांनी प्रसार माध्यमातून दिली.

स्व. मधुकरराव पिचड यांची नात गिरीजा म्हात्रे/पिचड यांची दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाला सदिच्छा भेट

# डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते सत्कार!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

महाराष्ट्र राज्यातील राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील ज्येष्ठ नेते तथा दिवंगत माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांची नात गिरीजा म्हात्रे/पिचड यांनी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी





कार्यालयाला आदरपूर्वक सदिच्छा भेट दिली.

या भेटीदरम्यान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ व दैनिक समर्थ गांवकरी समूह यांच्या वतीने डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांचा शाल, पुष्पगुच्छ, घड्याळ व पेढे देऊन सत्कार केला. यावेळी दैनिक समर्थ गांवकरी कार्यालयाचे उप संपादक निखिल भांगरे, तसेच व्यवस्थापक अमोल पुंडे उपस्थित होते.

# आचारसंहिता लागू होणार?

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

८ वर्षानंतर राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होत आहेत. पण त्यालाही ग्रहण लागले, कारण जिल्हा परिषद आणि मनपा आरक्षणामुळे आयोगाचे वेळापत्रक कोलमडले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, ३१ जानेवारी २०२६ च्या आधी राज्यातील सर्वा निवडणुका घ्यायच्या आहेत. त्यामुळे जिल्हा परिषद आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी लागणार? याकडे कार्यकर्ते अन् महाराष्ट्राच्या जनतेचे लक्ष लागलेय. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. आयोगाकडून जिल्हा परिषदेच्या आधी महापालिका निवडणुका घेण्याबाबत चाचपणी करण्यात येत आहे. त्यासाठीही तारखांची जुळवाजुळव करण्यात येत आहे.

# रुग्णाची दुर्मिळ व आव्हानात्मक मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया यशस्वी

**पिंपरी, भोसरी : (समर्थ गांवकरी)**

मेडिकव्हर KLE हॉस्पिटल, पिंपरी येथे 93 वर्षीय पद्माकर दिनकर उबाळे यांच्यावर यशस्वीरीत्या एक अतिशय गुंतागुंतीची मूत्रविज्ञान शस्त्रक्रिया करण्यात आली. तब्बल 50 वर्षे वाढत असलेला आणि तब्बल 1.6 किलो वजनाचा स्क्रोटल मास काढण्यात डॉक्टरांना यश मिळाले असून, रुग्णाला उपचारानंतर सुरक्षितरीत्या डिस्चार्ज देण्यात आला आहे.

उबाळे यांना 23 नोव्हेंबर 2025 रोजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. जवळपास 50 वर्षांपासून हळूहळू वाढत चाललेल्या स्क्रोटल सूजेसह दोन्ही पायांमध्ये सूज व वारंवार लघवी होण्याची तक्रार ते करत होते. तपासणीदरम्यान उजव्या बाजूला 20x20x15 सेंमी एवढा मोठा स्क्रोटल मास आढळला,



ज्याचे वजन अंदाजे 1.6 किलो होते. त्यासोबत हायड्रोसील-हेमॅटोसील आढळले. रुग्णाला COPD आणि हायपरटेन्शनचा देखील इतिहास होता. ही गुंतागुंतीची शस्त्रक्रिया 25 नोव्हेंबर 2025 रोजी करण्यात आली. डॉ. सुमित मनोहर राव चौधरी — कन्सल्टंट यूरोलॉजिस्ट, अँड्रोलॉजिस्ट, रेनल ट्रान्सप्लांट आणि लेप्रोस्कोपिक सर्जन — यांनी हायड्रोसेलेक्टॉमी, राइट ऑर्किडेक्टॉमी आणि ट्यूमर एक्सिसिजन या प्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केल्या. शस्त्रक्रियेदरम्यान सुमारे 1300 मि.ली. द्रव स्वरूपातील, दुर्गंधीयुक्त नेक्रोटिक फ्लूइड बाहेर काढण्यात आले. उजवे वृषण अत्यंत कडक व 'स्टोनी हार्ड' स्वरूपाचे दिसत असल्याने ऑर्किडेक्टॉमी आवश्यक ठरली.

रुग्णाच्या वय, दीर्घकालीन आजार आणि स्थितीच्या गुंतागुंतीमुळे ही शस्त्रक्रिया विशेष आव्हानात्मक होती. शस्त्रक्रियेनंतर आयव्ही अँटिबायोटिक्स आणि आवश्यक सपोर्टिव्ह औषधोपचार देत रुग्णावर बारकाईने लक्ष ठेवण्यात आले. उबाळे यांना 3 डिसेंबर 2025 रोजी समाधानकारक प्रकृतीत डिस्चार्ज देण्यात आला.

"93 वर्षांच्या रुग्णावर इतक्या मोठ्या आणि 50 वर्षांपासून वाढत असलेल्या 1.6 किलो मासची शस्त्रक्रिया करणे म्हणजे अत्यंत काटेकोर नियोजन आणि बहुविभागीय समन्वयाची आवश्यकता होती," असे डॉ. सुमित मनोहर राव चौधरी यांनी सांगितले. "ऊतींची जटिल रचना, 'स्टोनी हार्ड' स्वरूप आणि दीर्घकाळ टिकून राहिलेली समस्या यामुळे शस्त्रक्रिया आव्हानात्मक होती, परंतु रुग्णाने उत्तम प्रतिसाद दिला आणि त्यांची प्रकृती समाधानकारक आहे. हे पूर्ण वैद्यकीय टीमच्या समर्पित कार्याचे फलित आहे."

# साडेसात लाख शिक्षकांना घरभाडे भत्ता फरक देण्यास शासन विसरले

- ४ वर्ष उलटून गेल्यावरही शिक्षण संचालकांकडून कार्यवाही नाही- अनिल बोरनारे यांचा आरोप

**मुंबई:ठाणे : (समर्थ गांवकरी)**



जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीची घरभाडे भत्ता फरक थकबाकी इतर शासकीय कर्मचारी यांना देण्यात आली मात्र राज्यातील शिक्षकांना ही थकबाकी देण्यात आली नसून तातडीने देण्याची मागणी मुंबई मुख्याध्यापक संघटना उत्तर विभाग अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे

याबाबत अनिल बोरनारे यांनी शिक्षण संचालक कार्यालयाकडे वारंवार विनंती निवेदने पाठवून सुद्धा शिक्षण संचालक कार्यालय शिक्षकांची थकबाकी देण्यास गंभीर नसल्याचा आरोपही अनिल बोरनारे यांनी केला आहे

जुलै २०२१ पासून शासकीय कर्मचारी तसेच अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे घरभाडे भत्यात वाढ करण्यात आली आहे. ही वाढ २४% वरुन २७ % पर्यंत करण्यात आली आहे. माहे ऑक्टोबर २०२१ पासून प्रत्यक्ष २७ टक्के प्रमाणे वाढ देण्यात आली आहे. मात्र जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीची थकबाकी इतर शासकीय कर्मचारी यांना देण्यात आली मात्र राज्यातील शिक्षकांना शालार्थ मध्ये टॅब उपलब्ध न केल्याने ही थकबाकी देण्यात आली नाही हा शिक्षकांवर अन्याय आहे. कृपया याबाबत तातडीने निर्णय घेवून थकबाकी अदा करावी अन्यथा आपल्या कार्यालयासमोर या अन्यायाविरुदध अंदोलन करण्यात येईल अनिल बोरनारे यांनी निवेदनाव्दारे शिक्षण संचालकांना कळवले होते याबाबत तत्कालीन शिक्षण संचालक यांनी 9 मार्च 2023 च्या आदेशान्वये राज्यातील सर्व शिक्षण उपसंचालक यांना याबाबत प्रत्येक विभागात किती शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा माहे जुलै २०२१ ते सप्टेंबर २०२१ या कालावधीचा घरभाडेभत्ता फरक प्रदान करणे बाकी आहे याचा आढावा घेवून थकीत देयकांना संचालनालयाची प्रशासकीय मान्यता घ्यावी.

व लागणाऱ्या थकीत रकमेची मागणी ११ माही अंदाजपत्रकात करण्यात यावी, सदर थकीत देयकांचा कालावधी हा १ वर्षावरील असल्याने शासन निर्णय दि. १५ जुलै २०१७ अन्वये सदर थकीत देयकांना प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे असे सांगून माहिती प्राप्त झालेनंतर शालार्थमध्ये टीए एरिअर्स टॅब उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येईल असे लेखी पत्र अनिल बोरनारे यांना दिले होते.

या आदेशाचे पुढे काय झाले? हे पण गुलदस्त्यात असून शासनाने याबाबत तातडीने पावले उचलीत शिक्षकांना त्वरित घरभाडे भत्ता फरक द्यावा अशी मागणी अनिल बोरनारे यांनी केली आहे.

# राज्यातील २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर?

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

राज्यातील २० जिल्हा परिषदांच्या निवडणुका पुन्हा एकदा लांबणीवर पडल्या आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निकालाची वाट पाहत असल्याने आणि ५० टक्के आरक्षण मर्यादेचा पेच कायम असल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत ज्या जिल्हा परिषदेचे आरक्षण ५० टक्क्यांच्या आतमध्ये आहे, त्याची निवडणूक महापालिकेसोबत लागण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पुढील आठवड्यात महापालिकेची निवडणूक जाहीर होऊ शकते. त्यासोबत १२ जिल्हा परिषदेची निवडणूक लागण्याची शक्यता आहे. राज्यातील २९ महापालिकांसोबतच १२ जिल्हा परिषदांच्या निवडणुका घेण्याची चाचपणी आयोगाने सुरु केल्याची माहिती समोर आली आहे.

# तिरूमला तिरुपती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, अकोले शाखेचा दुसरा वर्धापन दिनानिमित्ताने डॉ. विश्वासराव आरोटे यांची भेट!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

हिंदुस्थानातील सहकार क्षेत्रात अग्रगण्य ठरलेल्या तिरूमला तिरुपती को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या अकोले शाखेच्या दुसऱ्या वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस व दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी सदिच्छा भेट देऊन शाखेच्या कामकाजाची माहिती घेतली.

यावेळी सोसायटीने अल्पावधीत, २४ कोटी रुपये ठेवी, ९ कोटी रुपये कर्जवाटप करत यशस्वी प्रगती साधल्याची माहिती शाखाधिकारी अनिकेत आंधळे व अंकित सांगळे यांनी दिली.

वर्धापन दिनानिमित्त सोसायटीचे शाखाधिकारी व अधिकारी यांचा शाल-घड्याळ देऊन डॉ विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार वेळी उत्कृष्ट शेतकरी दत्तू आरोटे, तसेच सामाजिक कार्यकर्ते अमोल पुंडे, शाखाधिकारी अनिकेत आंधळे, अंकित सांगळे, शाखा सल्लागार स्वप्नील आरोटे, सचिन आरोटे, श्रीकांत आरोटे यांचा समावेश होता.

अल्पावधीतच ठेवी, कर्जवाटप आणि सभासद बांधणीमध्ये उल्लेखनीय प्रगती करत ही सोसायटी अकोले परिसरात विश्वासाचे प्रतिक ठरत असल्याचे यावेळी पाहायला मिळाले.



# रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचा २१ डिसेंबर रोजी 'संकल्प मेळावा'

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

- केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्यासह मित्रपक्षाचे नेते करणार मार्गदर्शन

पुणे महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्ते, पदाधिकारी तसेस मनपा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांमध्ये निवडणूकीचे उत्साहवर्धक वातावरण निर्माण करण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाच्यावतीने 'संकल्प मेळाव्याचे आयोजन केले आहे.

हा संकल्प मेळावा २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ६ वा. अहिल्या आश्रम मैदान, डॉ बाबासाहेब आवेडकर महाविद्यालय, नाना पेठ, पुणे येथे होणार असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) चे पुणे शहराध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, अशोक कांबळे, अशोक शिरोळे, महेंद्र कांबळे, महिपाल वाघमारे, शाम सदाफुले, महिला शहराध्यक्ष हिमाली कांबळे, मोहन जगताप, बाबूराव घाडगे, भगवान गायकवाड, वसंत बनसोडे, डॉ. कपिल जगताप, रोहित कांबळे, निशांत सोनवणे आदि उपस्थित होते.

# अबकी बार भाजपा हद्दपार; ८०% समाजकारणासाठी रणरागिणी मैदानात

## गिरीजा पिचडांची कळसुबाईवरून गर्जना : अकोले तालुक्यातून देशभरात काँग्रेसचा पंजा बुलंद करण्याचा गिरीजा पिचड यांचा निर्धार!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातीलच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानात काँग्रेस पक्ष प्रमुखांनी माझ्यावर ठेवलेला विश्वास ही माझ्यासाठी मोठी संधी असून, या संधीचं सोने मी माझ्या कार्यातून करणार आहे. "पक्षाचा हाताचा पंजा पुन्हा सर्वसामान्य जनतेच्या मनात विशेष स्थान निर्माण करेल," असा ठाम विश्वास गिरीजा पिचड यांनी व्यक्त केला.

गिरीजा पिचड म्हणाल्या, "आजोबांनी दिलेली शिकवण आणि संस्कार हीच माझी खरी पुंजी आहे. घरगुती नातं बाजूला ठेवून पक्षहितासाठी मी झटणार आहे. काका, माजी आमदार वैभवराव पिचड यांनी माझ्याबाबत विचार करणे आवश्यक होते.



मी अनेकदा बोलले, पण ते ध्यानी घेतले गेले नाही, ही खंत आहे. मात्र माझ्या प्रवेशाचा निर्णय मी स्वतः घेतला असून त्यामागे राजकीय स्वार्थ नाही."

"मी काँग्रेसमध्ये प्रवेश केला तो निवडणुकांच्या दृष्टीने नव्हे. माझे व्हिजन वेगळे आहे. 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण हेच माझे ब्रीद आहे," असे सांगत त्यांनी "अबकी बार भाजपा हद्दपार" हा नारा बुलंद केला.

पक्षाचे प्रांतिक अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, माजी मंत्री बाळासाहेब थोरात व मधुकरराव नवले यांनी दाखविलेल्या विश्वासाचं मी सोने करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

वैयक्तिक टीकेला कडक इशारा – "मीही मधुकरराव पिचडांचीच कन्या!"

गिरीजा पिचड म्हणाल्या, "काँग्रेसमध्ये प्रवेश घेताच माझ्या कुटुंबावर कोणी वैयक्तिक आरोप करत असेल, खालच्या थरातील भाषा वापरत असेल तर मी जशास तसं उत्तर देईन. मीही माजी मंत्री स्व. मधुकरराव पिचड यांची कन्या आहे. पिचड कुटुंबाच्या वैयक्तिक अंगावर कोणी आले तर मीही हिरकणीसारखी उभी राहीन. 'पांडू हवालदार' सारखे लोक सहा वर्षांपासून गैरशब्द वापरत असतील तर त्या पांडूला देखील मी पुरून उरेन!"

आदिवासी समाजासाठी आजोबांची कर्तृत्वे आजही जनतेच्या मनात : "आपल्या आजोबांच्या क्रांतिकारी निर्णयांपैकी 'आदिवासी बजेट' हा एक ऐतिहासिक निर्णय आजही जनतेच्या मनात आहे. आमच्या कुटुंबावर संकटे आली, काका खचले, पण आज मी रणरागिणी म्हणून मैदानात उतरले आहे. आजी हेमलता पिचड यांची शिकवण मला बळ देते," असे त्यांनी नमूद केले.

"मी पदासाठी, सत्तेसाठी किंवा प्रसिद्धीसाठी नाही तर विकासाच्या गतीसाठी राजकारणात आले आहे. आजोबांचे आणि काकांचे स्वप्न पूर्ण करणे हीच माझी प्राथमिकता आहे. येत्या लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांत माझा करिष्मा दिसेल," असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

काँग्रेसचा पंजा पुन्हा जोमात काम करणार — नारीशक्ती एकत्र करण्याचा संकल्प: "राज्यभरातील 36 जिल्ह्यांत पुन्हा एकदा काँग्रेसचा पंजा हाय-हाय करणार. राहुल गांधी, सोनिया गांधी आणि बाळासाहेब थोरात यांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी मी नारीशक्ती एकत्र करणार आहे. सर्वसामान्य, गोरगरीब जनतेचा पंजा पुन्हा गतिमान करणार," असा ठाम निर्धार गिरीजा पिचड यांनी व्यक्त केला. अकोले तालुक्यातून सुरू झालेली त्यांची ही राजकीय लढत आता संपूर्ण राज्याच्या राजकारणात नवी दिशा देणारी ठरेल, अशी चर्चा रंगू लागली आहे.

**- डॉ. विश्वासराव आरोटे**
**कळसुबाई शिखरावरून!**

# इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत आयोजित विशेष जनजागृती कार्यक्रमामध्ये ह. भ. प. निरुपणकार श्री. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर महाराज) यांच्या कीर्तन कार्यक्रमास जिल्ह्यातील ग्रामस्थ आणि पदाधिकाऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, आणि राज्यमंत्री ग्रामविकास पंचायत राज योगेश कदम यांच्या विशेष पुढाकाराने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान कार्यक्रम अंतर्गत जनजागृती कार्यक्रम म्हणून आज दि. ११ डिसेंबर, २०२५ रोजी, सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत शिवाजीराव जोंधळे कॉलेज, पार्थसारथी पेट्रोल पंपाजवळ, महामार्ग क्रमांक ३ लगत, मुक्काम आसनगाव, ता. शहापूर, जि. ठाणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, प्रकल्प संचालक पंडित राठोड, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य सहसमन्वयक यास्मीन शेख, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान राज्य सहसमन्वयक रेश्मा शेख, शहापूर पंचायत समितीचे गट विकास अधिकारी बी. एच. राठोड, भिवंडी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी गोविंद खामकर, मुरबाड गट विकास अधिकारी लता गायकवाड, सरपंच रविना कचरे, उपसरपंच राहुल चंदे, ग्रामपंचायत अधिकारी उदयराज शेळके, अधिकारी- कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

> "ग्रामविकासाची खरी ताकद शासकीय योजना नियोजन बद्ध पध्दतीने राबविण्यासाठी ग्रामस्थांचा पुढाकार महत्त्वाचे आहे. आरोग्य, सौरऊर्जा, अंगणवाडी, शाळा वा रस्ते ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियान यशस्वी करायचे असेल तर गावकऱ्यांनीच एकदिलाने पुढे यायला हवे."
> — इंदुरीकर महाराज

इंदुरीकर महाराजांनी त्यांच्या नेहमीप्रमाणे प्रभावी, विनोदी व संदेशप्रधान शैलीतून ग्रामविकास, सामाजिक एकजूट, शासकीय योजनांचा योग्य लाभ, शिक्षण, व्यसनमुक्ती, जलसंवर्धन, तसेच प्रशासनावरील विश्वास याबाबत महत्त्वपूर्ण संदेश दिला. त्यांच्या वक्तृत्वाने उपस्थित नागरिकांचे मनोरंजन तर झालेच, पण त्यासोबतच विकास प्रक्रियेत नागरिक सहभागाचे महत्त्वही अधोरेखित झाले.

ग्रामपंचायत पातळीवर चालू असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाविषयी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करण्यास ही सभा उपयुक्त ठरले आहे.

जिल्ह्यातील विविध ग्रामपंचायतींमधील सरपंच, उपसरपंच, सदस्य, पदाधिकारी, महिला बचत गट, आरोग्य कर्मचारी, आशा सेविका, युवक मंडळे तसेच अनेक ग्रामस्थ नागरिकांनी कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.

कार्यक्रमाच्या माध्यमातून ग्रामविकासाच्या संकल्पना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचल्याचे समाधान जिल्हा प्रशासनाने व्यक्त केले.

# दिलेल्या शब्दाची वचनपूर्ती करणारे कार्यतत्पर नेतृत्व

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

आपल्या कार्यकर्तृत्वाने सर्वसामान्य जनतेच्या हृदयात आपले वेगळे स्थान निर्माण करणारे जिल्हा परिषदेचे मा.उपाध्यक्ष शिवसेना नेते सुजित झावरे पाटील यांनी गेल्याच आठवड्यात पारनेर शहरवासीयांना दिलेला शब्द पाळत वैशिष्ट्यपूर्ण निधी अंतर्गत पारनेर शहरातील रस्ता विकास कामे व स्मशानभूमी विकासकामाकरिता सुमारे २ कोटी रुपयांच्या निधीला महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना.एकनाथजी शिंदे साहेबांच्या माध्यमातून मंजुरी मिळविली असून त्याबाबतचे शासननिर्णय देखील सुजित झावरे पाटील यांना शासनस्तरावरुन प्राप्त झाला आहे...नववर्षाच्या पूर्वसंध्येला पारनेर शहराच्या विकास आराखड्याबरोबरच (डी.पी.आर.) मंजुरी सोबत २ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी व त्याबाबतचा शासन अध्यादेश असा डबल धमाका एका आठवड्याच्या आत सुजित



झावरे पाटील यांनी केला असून समस्त पारनेर शहरवासीयांना त्यांनी नवीन वर्षाची अभूतपूर्व भेट दिल्याचे मानले जात आहे....

या वैशिष्टपूर्ण निधी अंतर्गत

1) पारनेर जामगाव रस्ता ते बुगेवाडी,सोबलेवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे - ५० लक्ष
2) पारनेर ते सिध्देश्वरवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे - ५० लक्ष
3) पारनेर कान्हूर रोड ते दशक्रिया विधी रस्ता कॉक्रिटीकरण करणे - ५० लक्ष

तसेच पारनेर नगरपंचायत हद्दीतील स्मशानभूमी विकास करणे या कामासाठी ५० लक्ष रुपये असा एकूण २ कोटी रुपयाचा निधी ना.एकनाथजी शिंदे साहेबांनी अवघ्या आठ दिवसात मंजूर करुन त्याबाबतचा शासननिर्णय आज काढून ६ नोव्हेंबरच्या मेळाव्यात सुजित झावरे पाटील व समस्त पारनेरवासीयांना दिलेला शब्द खरा करुन दाखविला आहे. यावेळी बोलताना शिवसेना नेते सुजित झावरे पाटील म्हणाले अवघ्या एक महिन्यापूर्वी आमचे नेते लाडके उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे साहेबांनी पारनेरवासीयांना दिलेला शब्द पूर्ण करतानाच पारनेर नगर तालुक्यातील रखडलेल्या विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी देण्याचे आश्वासन दिले असून कुठलीही राजकीय महत्वकांक्षा न ठेवता मी स्वतः तालुक्यातील विकासकामांसाठी सदैव प्रयत्नशील असणार आहे.

# शिक्षण परिषदेतून बाल लैंगिक शोषणवर चर्चा

**कंधार : (समर्थ गांवकरी)**

श्री शिवाजी हायस्कुल कंधार येथे कंधार केंद्राची शिक्षण परिषद गटशिक्षण अधिकारी वसंत मेटकर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्र प्रमुख माधव कांबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. या शिक्षण परिषदेतून बाल लैंगिक शोषणवर जिल्हा परिषद बाभुळगाव येथिल शिक्षिका चोले जे.एस. ( सौ . मुंडे ) यांनी चर्चासत्र घडवून बालकांना समजून घेण्याचे आवाहन केले . शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्या सुचने प्रमाणे शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात येत आहे दि.१० डिसेंबर रोजी श्री शिवाजी हायस्कुल कंधार येथे आयोजित परिषदेची सुरुवात माता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करून करण्यात आली .या वेळी शिस्त म्हणजे काय ? सकारात्मक शिस्तीचे जिवनात महत्व अनन्य असते त्यासाठी शिक्षणात शिस्त रूजविण्याचे आवाहन यावेळी कोटबाजार केंद्राचे



शिक्षक अलिम शेख यांनी केले. जिल्हा परिषद बाभुळगाव येथिल शिक्षिका चोले जे.एस. यांनी बाल लैंगिक शिक्षण यावर मार्गदर्शन केले. शाळेतून गुड टच बॅड टच याविषयीची माहिती द्यावी बालकांवर काही अत्याचार झाला तर तो शिक्षकांना आई वडीलांना सांगण्याचा प्रयत्न करतो परंतु त्यांना समजून घेतले जात नाही आणि पुढे जाऊन त्यांचे शोषण होऊ शकते त्यामुळे पालकांनी जागरूक राहावे असे त्यांनी सांगितले तर घोडज केंद्रातील उपक्रमशिल शिक्षिक सौ मनिषा वाघमारे यांनी माता पालक गटाबाबत मार्गदर्शन केले.शाळेतून माता पालक शिक्षक संघाची स्थापना करण्याचे व बैठका घेऊन बालकांना आनंददायी व गुणवत्ता पूर्ण शिक्षण मिळवे म्हणून प्रयत्न करण्याचे त्यांनी सांगितले . तर केंद्र प्रमुख माधव कांबळे यांनी दि १६ डिसेंबर रोजी गणपतराव मोरे विद्यालय येथे होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देण्या बाबत सूचना दिल्या . यावेळी शिक्षण परिषदेला संजय वागलगावे,चंद्रकांत मामडे, ज्योती अवरे , गंगे , शिवाजी कांबळे , जयवंत शिंदे , शिवाजी हायस्कुल कंधार चे मुख्याध्यापक सदाशीव आंबटवाड , खाजगी आदीसह कंधार केंद्रातील खाजगी शाळा व जिल्हा परिषद शाळेतील शिकवणारे शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# समस्यांवर साधला संवाद

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

नांदेड ग्रामीण येथे पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी सुरक्षेसह अनेक समस्या बाबत सिडको सराफा असोसिएशन पदाधिकारी यांच्याशी संवाद साधत सराफा बाजारात येणाऱ्या अडचणी जाणून घेत महत्वाच्या सूचना ग्रामीण पोलीस स्टेशन येथे आयोजित बैठकीत दिल्या. दि१० डिसेंबर रोजी सकाळी सराफा व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणी दुकानात सीसीटीव्ही बसविणे डिजिटल लॉक ,सायरन बसविणे व आपसात चर्चा करून ताबडतोब निर्णय घेऊन पोलिसांना बोलावणे नवीन व संशयित व्यक्ती कडून सावध राहणे,पोलिसांची मदत लागल्यास आम्ही सदैव तुमच्या सेवेत तत्पर असल्याचे सांगितले व विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली.

# शिक्षण विभागात २० कोटींचा महाघोटाळा!

- बनावट शालार्थ आयडीद्वारे १६० कर्मचाऱ्यांची फसवणूक
- नितीन उपासनींचा मोठा गैरव्यवहार उघड!

**जळगाव/धुळे : (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या शिक्षण विभागाला हादरा देणारा तब्बल २० कोटी रुपयांचा शालार्थ आयडी घोटाळा प्रकाशात आला आहे. विभागीय शिक्षण मंडळाचे सेवानिवृत्त अध्यक्ष तथा तात्कालीन शिक्षण उपसंचालक नितीन उपासनी यांनीच बनावट शालार्थ आयडींना मंजुरी दिल्याचे धक्कादायक तथ्य समोर आले आहे. जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील ११ शाळांमध्ये तब्बल १६० बनावट कर्मचाऱ्यांचे शालार्थ आयडी तयार करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.




उपासनी हे नाशिक मनपा शिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत असताना त्यांनी आपला पदाचा गैरवापर करून अनेक संस्थाचालकांशी संगनमत करत विविध अनियमित व्यवहार केल्याची माहिती पुढे येत आहे. नाशिक मनपा हद्दीत काही खाजगी संस्थांनी जुने, अनुभवी शिक्षक डावलून लाखो रुपयांची देवाणघेवाण करून नवे शिक्षक नियुक्त केल्याचे आरोपही उघड झाले आहेत. उपासनी यांनी आपल्या वैयक्तिक कामासाठी काही संस्थाचालकांच्या वाहनांचाही वापर केला असल्याची चर्चा शिक्षण विभागात सुरू आहे.

या प्रकरणातील संशयित आरोपींमध्ये मनोज रामचंद्र पाटील (नवनगर, धुळे), निलेश निंबा पाटील (चोपडा), अविनाश पाटील, दत्तात्रय पाटील यांचा समावेश असल्याचे समजते. या सर्वांनी एकत्रित संगनमत करून शासनाला कोट्यवधी रुपयांचा गंडा घातल्याचा गंभीर आरोप आहे.

तपासादरम्यान आरोपींना संरक्षण देण्यासाठी आरोपपत्रात फेरफार केल्याप्रकरणी नाशिक रोड पोलीस ठाण्याचे तात्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक गिरी यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यामुळे या घोटाळ्याच्या मुळापर्यंत पोहोचण्यासाठी तपास यंत्रणांसमोर नवे प्रश्न निर्माण झाले आहेत. शिक्षण विभागातील हा महाघोटाळा २० कोटींवरच थांबतो की यापेक्षा जास्त रक्कम यात समाविष्ट आहे, हे पुढील तपासात स्पष्ट होणार आहे. राज्यातील शिक्षण व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या या प्रकरणाने सर्वत्र खळबळ उडाली आहे.

# खा. नीलेश लंके यांचा बाबा पीर रतननाथ मंदिराला पाठिंबा

- धार्मिक संवेदनशीलता अबाधित ठेवण्याची सरकारला सूचना
- खा. लंके यांची मंदिर परिसराला भेट

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

दिल्लीतील झंडेवालान परिसरातील बाबा पीर रतननाथ मंदिराच्या जमिनीवर महानगरपालिकेने केलेल्या बुलडोझर कारवाईनंतर स्थानिक भक्त आणि नागरिकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली आहे. धार्मिक भावनांना धक्का बसल्याचा आरोप होत असून हे प्रकरण राष्ट्रीय पातळीवर चर्चेचा विषय ठरले आहे. अशा संवेदनशील वातावरणात खासदार नीलेश लंके यांनी मंदिराला भेट देऊन परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करत भाविकांना धीर दिला.





महानगरपालिकेच्या कारवाईनंतर मंदिर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, कारवाई करताना ना पूर्वसूचना देण्यात आली, ना मंदिर व्यवस्थापनाशी चर्चा करण्यात आली. त्यामुळे धार्मिक परंपरा आणि श्रद्धेचा अनादर झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

घटनेनंतर खासदार निलेश लंके यांनी काल मंदिराला भेट देत मंदिर परिसराची पाहणी करून साधू–महंत व मंदिर व्यवस्थापनाशी समोरासमोर चर्चा केली. त्यांनी स्थानिक भक्तांच्या भूमिका व तक्रारींची माहिती समजून घेतली.

भेटीदरम्यान त्यांनी झालेल्या कारवाईबद्दल गंभीर चिंता व्यक्त करत धार्मिक स्थळांवरची कोणतीही सरकारी पावले अतिशय संवेदनशीलतेने, पारदर्शकतेने आणि कायदेशीर चौकटीत होणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

खासदार लंके यांनी मंदिर समितीला ठाम पाठिंबा दर्शवित पुढील पाऊल म्हणून केंद्र सरकारकडे लेखी निवेदन देणे, घटनेची चौकशी आणि न्याय मिळवण्यासाठी आवश्यक सर्व पावले उचलणे, धार्मिक भावना अबाधित ठेवण्यासाठी योग्य तो दबाव टाकणे यासाठी पुढाकार घेण्याचे आश्वासन दिले.

खासदारांच्या भेटीनंतर मंदिर परिसरात दिलासा व समाधान व्यक्त केले गेले. भक्तांनी "धार्मिक परंपरा, आस्था आणि सांस्कृतिक वारसा यांचा सन्मान राखावा" अशी ठाम मागणी पुन्हा अधोरेखित केली.

# जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळांमध्ये प्रवेश करावेत

**नायगाव : (समर्थ गांवकरी)**

नायगाव तालुक्यातील व नांदेड जिल्ह्यातील. सरकारी जिल्हा परिषदेच्या शाळा टिकल्या पाहिजे महाराष्ट्र शासनाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे दि ८ डिसेंबर पासून सुरुवात होत असल्यामुळे या अधिवेशनामध्ये जिल्हा परिषद महानगरपालिका व नगरपालिकेच्या सरकारी शाळेमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी दरमहा २५ हजार रुपये आणि नोकरीमध्ये पन्नास टक्के आरक्षण देण्यासंबंधीचे निवेदन नांदेड जिल्ह्यातील पाच आमदारांना जिल्ह्यातील उच्चशिक्षित नागरिकांच्या वतीने देण्यात येऊन यासंबंधीचा विषय सभागृहामध्ये मांडण्यात यावी अशी विनंती करण्यात आलेली आहे.

# टीईटी बंधनकारकतेवर पुनर्विचाराची मागणी

- खा. नीलेश लंके यांचे केंद्रीय शिक्षण मंत्र्यांना साकडे

**नवी दिल्ली : (समर्थ गांवकरी)**

देशभरातील प्राथमिक शिक्षकांवर शिक्षक पात्रता परीक्षा अनिवार्यतेचा परिणाम लक्षात घेऊन, अहिल्यानगरचे खासदार नीलेश लंके व खा. भास्कर भारे यांनी केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची भेट घेऊन टीईटी संदर्भातील धोरणात मानवी व सामाजिक दृष्टिकोनातून संवेदनशील बदल करण्याची मागणी केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आणि त्याचा शिक्षकांवर परिणाम झाला आहे. त्यांना १ सप्टेंबर २०२७ पर्यंत टीईटी उत्तीर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार, देशातील सर्व



प्राथमिक शिक्षकांना १ सप्टेंबर २०२७ पूर्वी टीईटी उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. खासदार लंके यांनी मंत्री प्रधान यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, "हा निर्णय लाखो शिक्षकांवर थेट परिणाम करणारा असून, त्यांच्या नोकरीच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण करणारा आहे." लंके यांनी स्पष्ट केले की, अनेक प्राथमिक शिक्षकांनी आपापल्या नियुक्तीच्या वेळी शासनाने ठरविलेल्या सर्व शैक्षणिक आणि प्रशिक्षण पात्रता पूर्ण केलेल्या आहेत. तसेच त्या काळातील आवश्यक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण केल्यावरच त्यांची नियुक्ती झाली आहे. त्यामुळे एनसीटीईने टीईटीची अट लागू करण्यापूर्वी नियुक्त झालेल्या शिक्षकांवर नंतरचे नियम लादणे योग्य नाही, असे मत त्यांनी नोंदविले.

# सिडको वासियांचा घर हस्तांतरित प्रलंबित प्रश्न विधानसभेत

**नवीन नांदेड : (समर्थ गांवकरी)**

शासन निर्णय होऊन ही गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला मुळ घर धारकांच्या प्रश्न हा अखेर कर्तव्यदक्ष लोकप्रिय नांदेड दक्षिण आ . आनंदराव पाटील बोढारकर यांनी हिवाळी अधिवेशनात दि १० डिसेंबर रोजी प्रश्न उपस्थित करून प्रशासनाचे लक्ष वेधले.. गेल्या अनेक वर्षांपासून सिडको नवीन नांदेड भागातील मुळ घर धारकांच्या अनुपस्थित मुद्राकांच्या आधारे प्रलंबित असलेला हा प्रश्न गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित असल्याने हजारो घर धारक प्रलंबित आहे यामुळे हजारो मालमत्ता धारक गेल्या अनेक वर्षांपासून प्रतिक्षेत होते, या बाबत शासनाने निर्णय देऊन ही या बाबत समिती स्थापन केली मात्र निर्णय न झाल्याने संबंधित मालमत्ता धारक त्रस्त होते. सिडको



CIDCO
WE MAKE CITIES

नवीन नांदेड प्रशासनाने या बाबत संबंधित मालमत्ता धारक यांच्या कडून कागदोपत्री माहिती घेतली या संबंधी मुंबई येथे संचालक मंडळ व नवीन नांदेड प्रशासक , राजकीय पक्षांच्या पदाधिकारी यांच्या अनेक बैठका झाल्या परंतु निर्णय होत नसल्याने नवीन येथील हजारो मालमत्ता धारक प्रतिक्षेत होते,अखेर नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघाचे कर्तव्यदक्ष आमदार आनंदराव पाटील बोढारकर यांनी मुळ घर धारक यांच्या अनुपस्थितीत मुंद्रकावर आधारित हस्तांतरित प्रश्न उपस्थित केला असुन हा प्रश्न मार्गी लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# बबनराव सोनवणे यांनी जिवणाचा सार सांगीतला : समाधान महाराज शर्मा

**पारनेर: (समर्थ गांवकरी)**

काव्य भारती काव्य संग्रहाच्या माध्यमातून कवी बबनराव सोनवणे यांनी जिवणाचा सार सांगीतला असून जिवण जगताना सेवाभाव व प्रेमभावनेणे आपण जग कसे जिंकू शकतो याची जाणीव यामाध्यमातून करुण देण्यात आली असल्याचे प्रतिपादन समाधान महाराज शर्मा यांनी व्यक्त केले आहे. कपिलेश्वर मंगल कार्यालयात कवी बबनराव सोनवणे यांच्या काव्य भारती या काव्यसंग्रहाचे प्रकाशन शर्मा महाराज यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ते बोलत होते. सेवानिवृत्त प्राचार्य शिवाजीराव पिंपरकर या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. यावेळी कवी व साहित्यिक कारभारी बाबर यांच्या नेतृत्वाखाली कवी संमेलन घेण्यात आले या कवी संमेलनात कवी व साहित्यिक प्रा.तुषार ठुबे, गणेश भोसले,




संदीप राठोड, सोमनाथ चौधरी, साहेबराव घुले, एकनाथ औटी यांनी सामाजिक व प्रबोधनपर कवीता सादर करीत उपस्थीतांच्या टाळ्या मिळवील्या. समाधान महाराज शर्मा आपल्या भाषनात म्हणाले सोनवणे सर यांनी गेली पाच ते सहा वर्षात शेकडो कवीतांच्या माध्यमातून समाजामध्ये असणारी प्रेमाची उपेक्षा मांडली माणसाने माणसावर प्रेम करावे तरच माणुसकी टिकून राहते हे दाखवून दिले. यामध्ये त्यांच्या पत्नी भारती यांनी महत्वपूर्ण भुमिका बजावली तसेच सोमनाथ वरखडे व आशाताई वरखडे यांनी खऱ्या अर्थाने साथ केली म्हणून हा काव्य भारती हा काव्यसंग्रह प्रकाशित करता आला याचे सर्व श्रेय जरी सोनवणे सर यांना असले तरी भारतीताई यांची भुमिका आणी योगदान सर्वाधिक असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले.विशेष म्हणजे समाधान महाराज शर्मा यांनी संपुर्ण भाषनात असंख्य कवीतांना एकत्र करीत कवीतांचा सार सांगताना सोनवणे सर यांचे जिवण प्रवास सांगीतला उपस्थीतांनी त्यांच्या या कवीतामय भाषनाला जोरदार दाद दिली.

प्रास्ताविक भाषनांत कवी बबनराव सोनवणे सर यांनी सांगितले की आजपर्यंत जवळपास १३० कवीता तयार केल्या असून काव्य भारती या काव्यसंग्रहात ८६ कवीतांचा सहभाग असून उर्वरित कवीता दुसऱ्या भागात प्रसिद्ध करणार आहे. गुरुवर्य समाधान महाराज शर्मा यांचे मार्गदर्शन तसेच पत्नी भारती यांची साथ तसेच सोमनाथ वरखडे व आशाताई वरखडे व सहकाऱ्यांनी केलेले सहकार्य यामुळे हा कवीता संग्रह प्रकाशित करु शकलो आणी प्रकाशनाच्या निमित्ताने कवी व साहित्यिक कारभारी बाबर यांनी या ठिकाणी कवींना आणीत घेतलेले कवी संमेलन उपस्थीतांना कवीतांची मेजवानी देणारे ठरले असून या ठिकाणी कार्यक्रमाला आलेले उपस्थित मान्यवरांच्या माध्यमातून मिळालेली प्रेरणा आणखीन काही कवीता संग्रह प्रकाशित करण्यासाठी उर्जा देणारी असल्याने सांगितले.

# अर्थवेद पतसंस्थेचे संचालक किरणजी गजे यांचा वाढदिवस उत्साहात; डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते सत्कार!



**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अकोले तालुक्यातील प्रवरा परिसरातील वाशेरे गावचे सरपंच आणि सहकार क्षेत्रातील अग्रगण्य अर्थवेद ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेचे कार्यकारी संचालक किरणजी गजे यांचा डॉ. विश्वासराव आरोटे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त शाल, खारीक-खोबरे हार, पगडी व घड्याळ भेट देऊन सत्कार केला. यावेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जुन्नर तालुका सचिव नयन डुंबरे, संपर्क प्रमुख पत्रकार रविंद्र गजे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यकर्त्यांनी आणि मान्यवरांनी किरणजी गजे यांना पुढील कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.



# कामठा ग्रामपंचायतीच्या वतीने जनजागृती रॅली

**अर्धापूर: (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील कामठा (बु.) ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील जिल्हा परिषद शाळा,श्री बसवेश्वर माध्यमिक विद्यालय या विद्यार्थ्यांची स्वच्छता रॅली गावातून मुख्य रस्त्यावरून काढण्यात आली. ग्रामस्थांसाठी सुवर्णसंधी मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत थकबाकी भरा ५०% टक्के पर्यंत सवलत मिळवा. महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार मालमत्ता कर आणि पाणीपट्टी कर थकबाकीदार ग्रामस्थांना एक मोठी सुवर्णसंधी आहे. त्यासाठी नागरिकांनी ग्रामपंचायत कार्यालय कामठा (बु.) येथे संपर्क साधावा. यावेळी सरपंच प्रतिनिधी विश्वनाथ दासे, हाजुसिंग कामठेकर,महंत आप्पा बरगळ, शंकर कंगारे, चंदबशी दासे,ग्रामसेवक डी.बी. आगलावे, शिवाजी गव्हाणे,ग्रामपंचायत सदस्य इरबा गुंजकर, सिद्धार्थ गव्हाणे, पप्पू गव्हाणे, साईनाथ रावले, भीमराव गव्हाणे, माधव कांबळे, केशव वाहुळकर, ईश्वर गव्हाणे, पांडुरंग गव्हाणे, रमेश गव्हाणे आदी सह श्री.बसवेश्वर हायस्कूल व जि प. शाळेतील शिक्षक वृंद व विद्यार्थी तसेच अंगणवाडी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांना निवेदनाव्दारे अहिल्यादेवी होळकर समारकाची केली मागणी

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

भोकर येथे लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारक व पुतळ्यासाठी महाराष्ट्र राज्य विधीमंडळातून नीधी मंजूर करून देण्यात यावे या बद्दल धनगर समाजाच्या शिष्ठ मंडळाने माजी मुख्यमंत्री तथा भाजपा नेते अशोकराव चव्हाण यांना निवेदन देऊन मागणी केली तर भोकर विधानसभा मतदार संघाचे आ श्रीजयाताई चव्हाण यांना फोन द्वारे पूर्ण माहिती देण्यात आली . निवेदनात असे निवेदन सादर करण्यात येते की,भोकर शहरात सर्व महापुरुषांच्या स्मारकासाठी जागा उपलब्ध आहे.पण ज्यांची धर्मपरायन प्रजाहितदक्ष राज्य चालवणारी जगविख्यात महाराणी लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक पुतळ्यासाठी भोकर शहरात अद्याप पर्यंत जागा नाही -



मी भोकर विधानसभा क्षेत्रातील मुदखेड, अर्धापूर,भोकर तालुक्यातील सर्व धनगर समाजाच्या प्रमुख मान्यवरांचे शिष्टमंडळासह महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा भाजपा खा.अशोकराव चव्हाण यांची भेट घेऊन विविध विषयांवर चर्चा करत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक व पुतळा तहसील कार्यालयासमोरिल जि.प.विश्राम गृहाच्या पडीत जागा उपलब्ध करून महाराष्ट्र राज्य विधीमंडळातून नीधी मंजूर करण्यात यावा यासाठी सकल धनगर समाज व यशवंत सेना ता.भोकर विधानसभा मतदारसंघाच्या वतीने दिले आहे.सध्या महाराष्ट्राचे हिवाळी अधिवेशन चालू असून आपण भोकर मतदार संघातील आमदार म्हणून प्रचलित आहोत,त्यासाठी आपणास या निवेदनाव्दारे विनंती करण्यात येते की, नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात विधीमंडळात लक्षवेधीव्दारे आवाज उठवून लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारक व पुतळ्यासाठी नीधी मंजूर करुण स्मारकाचा प्रश्न मार्गी लावावा हि विनंती नागोराव शेंडगे बापू ओबीसी नेते यांच्यासह समाज बांधवांनी केली आहे.

# ईडी आणि एटीएसची संयुक्त धडक छापेमारी

■ दहशतवादी कृत्याशी संबंधित आर्थिक व्यवहार प्रकरणी मोठी कारवाई सुरू

**भिवंडी : (समर्थ गांवकरी)**



भिवंडी तालुक्यातील पडघा जवळील बोरीवली गावात रात्रीपासून ईडी आणि एटीएस यांनी संयुक्त छापेमारी गुरुवारी पहाटेच्या सुमारास सुरू केली आहे. दहशतवादी कृत्यांशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या तपासाच्या अनुषंगाने बोरीवली गावातील अनेक निवासी घरांवर कारवाई करत छापेमारी केलीय. बोरीवली गावात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. ईडी आणि एटीएस यांच्या ताफा बोरीवली गावात दाखल झाला असून डझनभर गाड्या गावात दाखल झाले असून तपास सुरू आहे. धक्कादायक बाब म्हणजे, भिवंडी तालुक्यातील बोरिवली गाव 'एनआयए' च्या रडारवर गेली २५ वर्षापासून आहे.

ईडीच्या माहितीनुसार, फक्त भिवंडीतीलच नव्हे तर बोरीवली, पुणे, मालेगाव यांसह महाराष्ट्रातील सुमारे ४० ठिकाणी तसेच दिल्लीमध्येही ही सर्च ऑपरेशन मोहीम राबवली जात आहे. आयएसआय टेरर मॉड्यूलशी संबंधित संशयित आर्थिक हालचालींच्या तपासात ही कारवाई केली जात असल्याची माहिती समोर येत आहे. एन. आय ए.ने दाखल केलेल्या प्रकरणाच्या आधारे ईडीने अलीकडेच ECIR नोंदवला असून, हा तपास साकिब नाचन प्रकरणाशी जोडला गेला आहे. २८ जून रोजी कारागृहात मृत्यू झालेल्या साकिब नाचनच्या दफनविधीनंतर एटीएसची ही पहिली मोठी हालचाल मानली जात आहे. एटीएस आणि ईडीने एक संयुक्त ऑपरेशनल ग्रिड तयार करून मिळालेल्या लीड्स व माहितीच्या आधारे तातडीने कारवाई केली आहे. या कारवाईमुळे बोरीवली गाव पुन्हा एकदा चर्चेत आला असून संपूर्ण बोरीवली गावाला पोलिसांच्या छावणीचे स्वरूप आले आहे. तसेच पुढील तपास सुरू आहे.

# टोळक्याने तरुणाला केली मारहाण

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

पाथर्डी रोडवरील हॉटेल समाधानसमोर भिंगार येथे किरकोळ अपघाताच्या कारणावरून पाच जणांच्या टोळक्याने एका तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. यात तरुणाच्या डोक्याला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे. याप्रकरणी कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे. फिर्यादी आयुष विकास साळवे (वय- १८,रा. गवळीवाडा, भिंगार) यांच्या दुचाकीचा आरोपीच्या दुचाकीला धक्का लागला. याच क्षुल्लक कारणावरून आरोपी विकी गायकवाड, अक्षय गायकवाड, निलेश शिंदे, गणेश पंडित आणि आकाश तांबे (सर्व रा. भिमनगर, भिंगार) यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून लोखंडी रॉडने फिर्यादीच्या डोक्यात तसेच दगडाने पायावर व नाकावर मारून गंभीर जखमी केले.

# ७२ कोटींची पाणी योजना तातडीने मंजूर करावी : आ. काशिनाथ दाते

**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या हिवाळी अधिवेशनात बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी नगरविकास तसेच पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पुरवणी मागणीवर बोलताना पारनेर शहरासह तालुक्यातील महत्त्वाच्या प्रश्नांना अत्यंत ठामपणे हात घातला.

आमदार दाते म्हणाले की, "पारनेर शहरातील पाणीपुरवठ्याची समस्या गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. हंगा पाझर तलावातून ५० वर्षांपूर्वी तयार झालेल्या योजनेवर शहर अवलंबून आहे, तर २० वर्षांपूर्वी झालेली सुधारणा आजच्या गरजांसमोर अपुरी ठरत आहे." सद्यस्थितीत पूर्ण दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने मुळा धरणाच्या बॅकवॉटरमधून प्रस्तावित ७२ कोटींच्या नव्या पाणी



योजनेला तातडीने मंजुरी द्यावी, अशी त्यांनी जोरदार मागणी केली.

आमदार दाते पुढे म्हणाले की, "पारनेर नगरपंचायत अस्तित्वात आल्यापासून आजपर्यंत तिचे कामकाज बचत गटाच्या इमारतीत सुरू आहे. वाढत्या लोकसंख्येचे नियोजन, सेवा-शिस्त आणि प्रशासनिक सोयी लक्षात घेता नगरपंचायतीचे स्वतंत्र प्रशासकीय भवन अत्यावश्यक आहे. त्यालाही तातडीने मंजुरी मिळावी."

पारनेर तालुक्यातील पाणीपुरवठ्यासंबंधी गंभीर मुद्दा उपस्थित करत आमदार दाते यांनी विधानसभेत लक्ष वेधले की, तालुक्यातील ६५ पैकी ६५ जलजीवन योजनांचे काम अपूर्ण, निकृष्ट आणि भ्रष्टाचाराने ग्रासलेले आहे. त्यांनी या सर्व योजनांची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आणि सर्व योजना त्वरित कार्यान्वित करण्याची मागणी केली. याचवेळी बोलताना आमदार दाते यांनी गेल्या वर्षभरापासून सातत्याने केलेल्या मागणीचा विचार करून नगरविकास विभागाचे मंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पारनेर शहराच्या विकास आराखड्याला मंजुरी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. आमदार दाते यांच्या या ठाम, अभ्यासपूर्ण आणि विकासाभिमुख मागण्यांमुळे पारनेर तालुक्याच्या जीवनमानाशी निगडित पाणीपुरवठा व नागरी सुविधा या मुद्द्यांना अधिवेशनात योग्य न्याय मिळाला आहे. अधिकारी व सबंधित विभागाने या मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावा, अशीच अपेक्षा मतदार संघातील नागरिकांद्वारे व्यक्त केली जात आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रम उत्साहात

■ अविष्कार २०२६ संशोधन संमेलनातून तरुण मनांना संशोधनाची प्रेरणा

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**




स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये ९ डिसेंबर, २०२५ रोजी 'स्कूल कनेक्ट' कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. जिल्हा परिषद शाळा, विष्णुपुरी तसेच परिसरातील विविध शाळांमधील विद्यार्थी व शिक्षकांनी या कार्यक्रमात सहभागी होत विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि संशोधनात्मक वातावरणाचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. हा कार्यक्रम 'अविष्कार २०२६' महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठ संशोधन संमेलनाचा एक महत्त्वपूर्ण घटक ठरला. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण आणि संशोधनाबद्दल प्रेरणा निर्माण करणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमाला जिल्हा परिषद नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आय.ए.एस. मेघना कावली यांनी पाठिंबा दर्शवून या प्रभावी उपक्रमाबद्दल विद्यापीठाचे कौतुक केले. "शालेय आणि उच्च शिक्षणातील अंतर कमी करणे व तरुण पिढीत नावीन्याची ज्योत पेटविण्यासाठी अशा उपक्रमांची मोठी गरज आहे," असे त्या म्हणाल्या. विद्यार्थ्यांनी विद्यापीठातील संशोधन सहभागींनी सादर केलेल्या पोस्टर्स, मॉडेल्स, नवोन्मेषी प्रात्यक्षिके यांचे निरीक्षण केले. विविध विभागांच्या मार्गदर्शित भेटीत त्यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी सांगितले, "आजचे विद्यार्थी हे उद्याचे नाविन्यकर्ते आहेत. 'स्कूल कनेक्ट' मुळे आम्ही त्यांच्या तरुण मनात जिज्ञासा आणि संशोधनाची ओढ निर्माण करीत आहोत. त्यांना संशोधन आणि उच्च शिक्षणातील भविष्याची कल्पना करण्यास प्रोत्साहन देत आहोत." शालेय स्तरापासून संशोधन केंद्रित विचारसरणी विकसित करण्याच्या विद्यापीठाच्या वचनबद्धतेवर त्यांनी पुन्हा एकदा भर दिला. 'स्कूल कनेक्ट' सारखे उपक्रम भविष्यातील विचारवंत आणि नेते घडवण्यासाठीच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहेत, जे राज्याच्या सकल नोंदणी प्रमाण (जीईआर) वाढविण्याच्या ध्येयाशी हा उपक्रम सुसंगत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. एस. जे. वाढेर, आयक्यूएसी सेलचे संचालक डॉ. बी. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि अविष्कार २०२६च्या समन्वयक डॉ. रुपाली एस. जैन यांच्या समर्पित प्रयत्नामुळे शक्य झाला.

# खुली पाकिटे आढळली

**हिमायतनगर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील मौजे सरसम बु.जवळील म्हसोबा नाल्यामध्ये अंगणवाडीच्या बालकांना वाटप करण्यात येणाऱ्या खाऊचे अनेक खुले पाकीट एकत्र आढळून आले आहेत. बालकांना हा खाऊ देऊन सद्दढ करण्याचा संकल्प सरकारने केलेला होता पण ही खुले पाकिटे मोठ्या प्रमाणावर सापडल्यामुळे या खाऊच्या पाकिटांचा काळाबाजार होतोय का ? हा प्रश्न उद्भवला आहे. याबाबत दलित पँथरचे तालुकाध्यक्ष विजय वाठोरे यांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कार्यवाही करा असे निवेदन बालविकास प्रकल्प अधिकारी हिमायतनगर यांना दिले आहे.याविषयी सविस्तर वृत्त असे की हिमायतनगर तालुक्यातील भोकर ते हिमायतनगर या महामार्गावरील सरसम बु.जवळील म्हसोबा नाल्यात अंगणवाडीच्या बालकांना वाटला जाणाऱ्या खाऊची खुली पाकिटे मोठ्या प्रमाणात आढळल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

# फ्लेक्स प्रिंटिंग ही अत्याधुनिक सेवा निंभोरामध्ये सुरु

■ पियुष या तारणाचा ग्रामिण भागात सेवा मनोदय

**रावेर : (समर्थ गांवकरी)**

तालुक्यातील निंभोरा येथील पियुष चिंचोले ग्राफिक्स अँड प्रिंटिंग या नव्या व्यवसायाचे भव्य उद्घाटन नुकतेच अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले . उद्घाटन प्रसंगी स्थानिक राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, जिल्ह्यातील उद्योजक आणि गावातील व परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

या आधुनिक ग्राफिक्स आणि प्रिंटिंग व्यवसायात फ्लेक्स प्रिंटिंग मशीनसह उच्च दर्जाच्या प्रिंटिंग सेवा आता निंभोरा गावात उपलब्ध होणार आहेत.

उद्घाटन समारंभात उपस्थितांनी व्यवसायाच्या यशस्वी भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि आधुनिक प्रिंटिंग तंत्रज्ञानाची



माहिती घेतली. विशेषतः महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ उत्तर महाराष्ट्र संघटक अहिल्यानगर,नाशिक, धुळे,नंदुरबार,जळगांव व दैनिक लोकशाही प्रतिनिधी मा.श्री.विनोद रामचंद्र कोळी (शिवा भाई G) व निंभोरा पोलीस स्टेशनचे पि आय हरिदासजी बोचरे साहेब जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष नंदकिशोर महाजन ,उपस्थित होते. त्यांनी या तरुण उद्योजकाल ही प्रणाली ग्रामिण भागात आणल्याने व्यवसायाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमामुळे परिसरात व्यवसाय आणि तंत्रज्ञान क्षेत्रात नवीन प्रेरणा निर्माण झाली असून, स्थानिक लोकांना उच्च दर्जाच्या प्रिंटिंग सेवांचा अनुभव घेता येणार आहे.

# ग्लोबल एक्झिबिशन प्रकल्प अत्यंत लाभदायक ठरणार

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

कृषी विज्ञान केंद्र (KVK), नारायणगाव येथे एक महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली होती.या बैठकीसाठी केवळ प्रमुख स्थानिक स्वयंसेवी संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते त्यापैकी चाईल्ड फंड इंडिया ही एक होती.बैठकीमध्ये शेतकरी,महिला व युवकांच्या सहभागाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.चाईल्डफंड इंडियामधून अभिजीत रामदास मदने,दीपाली जगताप,विश्वास गालफाडे,शेवंता वाघ आणि योगेश मस्करे यांनी उपस्थिती नोंदवली. संस्थेची भूमिका,सुरू असलेली प्रकल्प कामे, चाईल्डफंड इंडियाने दिलेले योगदान आणि प्रकल्पाची भविष्यातील दिशा याबाबत चर्चा झाली.तसेच KVK सोबत सहकार्य,फील्ड-लेव्हल सपोर्ट आणि MOU करण्याची शक्यता या मुद्द्यांवरही विचार विनिमय करण्यात आला.



याशिवाय, KVK एक्झिबिशन फील्ड मध्ये कशी मांडणी केली जाईल,याबाबत प्लॉट लेआउट,स्टॉल नियोजन आणि स्थळाची संपूर्ण तयारी यासंदर्भात सविस्तर माहिती देण्यात आली.चाईल्डफंड इंडियामधून जवळपास १५० ते २५० महिला,युवक व शेतकरी या कार्यक्रमात सहभागी होतील,अशी माहिती देण्यात आली. काही CITI लाभार्थी आपल्या स्टॉलची व्यवस्था करतील.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचा बेजबाबदारपणा

■ बहाद्दरपुरा पुलावरून लोडिंग गाड्यांची ये जा चालू

■ अंडरवॉटर परीक्षणाच्या नावाखाली फक्त एसटी बसलाच घातली जाते का बंदी

■ पूल तीन महिन्यापासून एसटी बस साठी बंद का ?

**कंधार : (समर्थ गांवकरी)**



गेल्या ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे बहाद्दरपुरा मन्याड नदीवरील पुलावरून दोन वेळा पाणी गेल्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव पुलाचे अंडरवॉटर परीक्षण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सूचनेनुसार कंधार बस डेपोने या पुलावरून एसटी बस गेल्या तीन महिन्यापासून बंद ठेवल्या आहेत त्यामुळे प्रवाशांचे प्रचंड हाल होत असून याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुमित पाटील यांच्याशी दोन वेळेस संपर्क केला असता दोन्हीही वेळेस ४ ते ५ दिवसात अंडरवॉटर परीक्षण करून निर्णय घेण्यात येईल असे सांगून वेळ मारून नेली. चार-पाच दिवसात परीक्षण करण्यात येईल असे सांगूनही जवळजवळ एक महिन्याचा कालावधी होत आहे परंतु यावर कोणताच निर्णय घेतला जात नसल्यामुळे आणि याच पुलावरून दुसऱ्या डेपोच्या एसटी बस आणि एसटी पेक्षा कितीतरी अवजड वाहने जात येत असल्यामुळे फक्त कंधार आगाराच्याच एसटी बसच्या गाड्यांना बंदी का असा प्रश्न या भागातील जनतेला पडला असून याविषयी सार्वजनिक बांधकाम विभागाचा बेजबाबदारपणा दिसून येत आहे. याविषयी गेल्या महिन्यात १३ नोव्हेंबर रोजी दूरध्वनीवरून संपर्क केला असता सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुमित पाटील यांनी ५ ते ६ दिवसांमध्ये अंडरवॉटर सर्वेक्षण करून एसटी बस सोडण्यात येईल असे सांगितले होते मात्र या बाबीस २० ते २५ दिवस झाले तरीही फुलाचे अंडरवॉटर सर्वेक्षण तर सोडाच पण मुलाकडे कोणीही पाहिलेही नाही त्यामुळे पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता सुमित पाटील यांच्याशी संपर्क केला असता पुन्हा त्यांनी चार-पाच दिवसात फुलाचे सर्वेक्षण करण्यात येईल असे सांगितले आणि वेळ मारून नेली. मात्र याच पूलावरून उदगीर डेपोची एसटी बस आणि रेती वाहण्यासारखे हायवा टिपर, १६ टायरी अवजड वाहने, ऊस वाहतूक करणारी अवजड वाहने याच पुलावरून वाहतूक करतात परंतु याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग गांभीर्याने पाहत नाही किंवा या अवजड वाहनांना विजा करण्यासाठी अडवले जात नाही.

याचाच अर्थ सार्वजनिक बांधकाम विभागाला या पुलाविषयी कोणतेही गांभीर्य नसल्याचे दिसून येत असून खरेच जर पुलाचे अंडरवाटर परीक्षण करायचे असेल तर या पुलावरून अवजड वाहने ये जा करत आहेत. त्यांना कारखवले जात नाही, आणि या अवजड वाहनांच्या ये जा करण्यामध्ये काही धोका झाल्यास याला जबाबदार कोण ? असा प्रश्न जनतेतून विचारला जात आहे.

या पुलावरून जांब, जळकोट, उदगीर आणि मुखेड जाणाऱ्या - येणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल होत असून तसेच या मार्गावरील बसेस घोडज - शेकापूर मार्गे जात असल्यामुळे या प्रवाशांना हा पूल एसटी बस वाहतुकीसाठी बंद असल्याकारणाने या मार्गावरील प्रवाशांना कंधारला येऊन पर्यायी मार्गाने पुढे जावे लागत असल्यामुळे त्यांना तिकिटांचा अतिरिक्त आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये प्रचंड नाराजीचा सूर उमटत असून या फुलाचे अंडरवॉटर परीक्षण ताबडतोब करून या मार्गावरून एसटी बसेस सुरू कराव्यात अशी जनतेतून मागणी होत आहे.

# मनपाची अन्यायकारक घरपटटी नोटीस रद्द करावी

## अन्यथा नागरिकांसमवेत जनआंदोलन करणार

- प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांची निवेदनाव्दारे आयुक्त यशवंत डांगे यांना इशारा

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मनपाचे प्रथम महापौर भगवान फुलसौंदर आज मनपा आयुक्त यशवंत डांगेची भेट घेत अन्यायकारक घरपटटी नोटीस रदद करावी ही मागणी करत कर आकारणी रदद न केल्यास नागरिकांसमवेत जनआंदोलन करणार असा इशारा दिला आहे. सदर मागणीचे निवेदन प्रथम महापौर भगवान फुलसौंदर यांनी आयुक्त यशवंत डांगेकडे दिले आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, मनपाने सुधारीत व अन्यायकारक कर आकारण्यात आलेले असून



संदभात दिल्ली येथील खाजगी कंपनीर्मार्फत सर्व्हेचे काम झालेले असून सदर कंपनीला सदर काम अंदाजे ४ ते ५ कोटी रूपयाना दिले आहे सदर कंपनी व अधिकारी कर्मचारी संगनमताने शहरातील आर्थिक लुट चालू केलेली आहे.

वास्ताविक नगर शहर सर्वसामान्याचे गाव आहे इथे कोणत्याही मोठया रोजगाराचे स्थान नसल्याने आर्थिक स्थर खालावलेला आहे मनपा ही नफा कमावणारी संस्था नसून सेवा देणारी संस्था आहे मनपा दवाखान्यामध्ये कुठलीही वैदयकीय सुविधा मिळत नाही नागरिकांना दिल्या जाणाऱ्या आरोग्य, पाणी, रस्ते, लाईट या सेवा तुटपुंज्या आहेत शहरातील स्वच्छतागृहे पाडलेली आहेत पार्किंगच्या नावाखाली ठेकेदार नागरिकांची लुट करत आहेत.

ठेकेदार संस्थेने सर्व्हे करताना घरातील खोली समवेत बाल्कनी, ओपन, पसेज, पार्किंग, पोर्च जनावराचे गोठे यासाहित कर आकारणी घेतली आहे त्यामुळे प्रत्येक जुन्या मालमत्तेला सुध्दा चारपट टॅक्स वाढलेला आहे शहरात काही मिळकत धारकाकडे भाडेकरी आहे त्यांना आर्थिक मागणी करून तडजोड केली जात आहे ज्यांनी पैसे दिले नाही त्यांना भाडयाप्रमाणे कर आकारणी करून भरमसाठ टॅक्स वाढवलेला आहे कर आकारणी करताना आरसीसी, लोड बेरिंग, पत्रा, टी अंगल आदीनुसार दर असताना प्रत्येक घरांना आरसीसी जास्तीचे दर लावलेले आहे मनपाने पंचनामा नकाशे किंवा कुठलेही पुरावे न पाहता एकतर्फी निणय घेतले आहे.

त्यामुळे कुठल्याही सुविधा न पुरवता घरपटटीचे अन्यायकारक बिले वाटप करून नागरिकांचे कंबरडे मोडण्याचे काम मनपा प्रशासन करत आहे नगरकरांना स्वत चे घर असून ते भाडयाने राहण्याचा खर्च घरपटटी व्दारे होत आहे.

त्यामुळे अन्यायकारक घरपटटी बिले रदद करून मनपा कर्मचाऱ्यामाफत सदर सर्व्हे करून नगरकरांची आर्थिक लुट थांबवून न्याय दयावा अन्यथा नागरिकांसमवेत जनआंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# वाढीव घरपट्टी मालमत्ता कर तातडीने रद्द करावा

## अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा

### विविध संघटनांचे मनपा उपायुक्त श्री लहारे यांना निवेदन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर महानगरपालिकेने वाढीव घरपट्टी मालमत्ता करात नव्याने मोठ्या प्रमाणात आकारणी केली जात आहे.महानगरपालिकेने वाढीव मालमत्ता कर तातडीने रद्द करावा.अन्यथा येत्या आठ दिवसात आमरण उपोषण करण्यात येईल.असा इशारा शहरातील विविध संघटनांच्या वतीने देण्यात आला आहे.

याबाबतचे निवेदन महानगरपालिकेचे उपायुक्त श्री लहारे यांना देण्यात आले. यावेळी सकल माळी समाज ट्रस्ट अहिल्यानगर,युथ फॉर्म होमिओपॅथी संघटना,सावेडी डॉक्टर असोसिएशन, राष्ट्रवादी डॉक्टर सेल या संघटनांचे पदाधिकारी



मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे व होमिओपॅथी डॉक्टर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष डॉ.रणजीत सत्रे, माजी नगरसेवक अर्जुनराव बोरुडे, सावेडी डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. भगवान कराळे, डॉ.अशोक भोजने,डॉ.सुरेंद्र खन्ना,डॉ.राहुल वाघुले,डॉ.नितीन झावरे,सकल माळी समाज ट्रस्ट चे सचिव राजेंद्र पडोळे,विश्वस्त विनोद पुंड,कोर कमिटी सदस्य अनिल इवळे,ॲड.राहुल रासकर, सुरेश कावळे चंद्रकांत पुंड, ब्रिजेश ताठे, नईम शेख, ओंकारेश्वर झावरे,पोपट शिंदे, गणेश कोल्हे, रमेश चिपाडे, मच्छिंद्र बनकर, हंसराज पटेल आदी उपस्थित होते.



# "टॅलेंट प्रश्नसंच" पुस्तिकेचे प्रकाशन

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

- टॅलेंट प्रश्नसंच बौध्दिक विकासाचा श्रोत- संजय जोशी

हिंद सेवा मंडळा तर्फे स्टुडंट टॅलेंट सर्च या स्पर्धा परीक्षेचे गेल्या १८ वर्षापासून यशस्वी अयोजन केले जाते.इयत्ता पहिली ते पाचवी साठी जिल्हास्तरावर आयोजित या स्पर्धा परीक्षेस जिल्हयातील ५००० विदयार्थी सहभागी होतात.

स्टुडंट टॅलेंट सर्च ही स्पर्धा परीक्षा एक दर्जेदार स्पर्धा परीक्षा असून त्यासाठी टॅलेंट प्रश्नसंच बौध्दिक विकासाचा श्रोत असून स्पर्धा परीक्षेस दिशा दर्शक ठरेल.असे प्रतिपादन हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांनी केले आहे. मार्गदर्शक पुस्तिका स्पर्धा संयोजक विठ्ठल उरमुडे यांनी तयार केली."टॅलेंट प्रश्नसंच"चे प्रकाशन हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी,जेष्ठ मार्गदर्शक अजित बोरा,स्पर्धा प्रमुख मधुसूदन सारडा व सीताराम सारडा विदयालयाचे मुख्याध्यापक अशोक डोळसे यांचे हस्ते संपन्न झाले.

स्टुडंट टॅलेंट सर्च स्पर्धा प्रमुख मधुसूदन सारडा म्हणाले,स्टुडन्ट टॅलेंट सर्च या स्पर्धा परीक्षेस जास्तीत जास्त विदयार्थ्यांनी प्रविष्ठ व्हावे.३१ डिसेंबर २०२५ पर्यंत नोंदणी करावी.असे आवाहन केले.

याप्रसंगी शाळेतील शिक्षिका, सौ.अंजली सासवडकर,सौ. अरुणा धाडगे,सौ.विदया पोतदार,सौ.मनिषा साळी,सौ. कल्पना चावरे,मुदस्सिर पठाण, अभिजित जवादे,संदिप कळसकर आदी उपस्थित होते.

# १६ डिसेंबरला शिवसेनेचा रास्तारोको

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

गेल्या अनेक वर्षांपासून अरणगाव ते बाबूर्डी या वाळकी रस्त्याच्या दुरुस्तीचे कामाची मागणी होते आहे,दर रस्ता अत्यंत रहदारीचा आहे.येथील असणाऱ्या खड्यामुळे येथे मोठ्या प्रमाणात अपघात होत असून, अपघाता मूळे येथे मृत्यू चे प्रमाण वाढले आहे. अनेक नागरिकांना अपंगत्व आलेले आहे.तरी आरणगाव ते बाबूर्डी या वाळकी रस्त्याच्या दुरुस्तीचे काम तात्काळ करण्यात यावा अन्यथा १६ डिसेंबरला आरणगांव वाळकी रोड येथे शिवसेना च्या वतीने रस्ता रोको करण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी ही शासनाची असेन असे निवेदन आज जिल्हाधिकारी यांना शिवसेनेच्या वतीने देण्यात आले.

# बिलोली केतया स्वामी जयंती उत्साहात साजरी

- उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप उपक्रम

**नांदेड जिल्हा : (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहरात बुरूड समाजाचे आराध्य दैवत महान तपस्वी केतया स्वामी महाराज यांची जयंती मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात युवानेते इंद्रजित तुडमे, अभिजित तुडमे, प्रदिप अंकुशकर,अध्यक्ष किशोर नागेश्वर,पोशट्टी जोरगेवार,छत्राजी नागेश्वर, रमेश गुडमलवार,मारोती जोरगेवार यांच्या हस्ते स्वामींच्या प्रतिमेचे पूजन तसेच दीपप्रज्वलन करून करण्यात आली. या वेळी उपस्थित मान्यवरांचे समाजाचा वतिने सत्कार करण्यात आला. मान्यवरांनी आपल्या मनोगतात स्वामींच्या विचारांतून समाजातील



एकता, सेवा व संस्कार यांचे महत्व अधोरेखित केले. कार्यक्रमानंतर सामाजिक बांधिलकी जोपासत बिलोली शहरातील उपजिल्हा रुग्णालयात फळवाटप करण्यात आले. जयंतीच्या निमित्ताने घेतलेल्या या उपक्रमामुळे रुग्णालय परिसरात आनंद व सकारात्मकतेचे वातावरण निर्माण झाले होते युवकांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या समाजोपयोगी कार्यक्रमाचे उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. स्वामींच्या जयंतीदिनी बिलोली शहरात बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तदनंतर छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. बिलोली शहरातील मुख्यचौकात फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली. स्नेह भोजनांनी कार्यक्रमाची सांगता झाली. मोठ्या हर्ष उल्हासात, शांततेत जयंती साजरी करण्यात आली.

बुरुड समाजाचे,तुळशीराम नागेश्वर, बालाजी सुनेवाड,सायलू नागेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली नारायण जोरगेवार,जळबा गुडमलवार,जळबा नागेश्वर, गोविंद गुडमलवार ,सुनिल सुनेवाड,मोहन गुडमलवार, संजय जोरगेवार,शंकर गुडमलवार,मारोती नागेश्वर, रमेश गुडमलवार,भुमेश गुडमलवार,बालाजी जोरगेवार समाजातील महीला भगिंनी, अबालवृद्ध,युवक, मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# बिराजदार गुरुजींचा भव्य निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न

**नांदेड जिल्हा (समर्थ गांवकरी)**

बिलोली शहरातील रविंद्र नगर येथील गंगामता शिक्षण प्रसारक मंडळ संचालित निवासी मुकबधीर विद्यालयात मान्यवरांच्या उपस्थितीत सेवा निवृत्त सहशिक्षक आनंदराव पाटील बिराजदार गुरुजींचा भव्य दिव्य निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला आहे.

सदरील कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचीव बि.पी.नरोड होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पालक प्रतिनिधी माणिकराव गंभिरे,

पिपल्स मल्टी अर्बन निधी बँकेचे शाखाधिकारी जि.एम.मुंढकर होते.

कोणत्याही प्रकारची सामाजिक कार्याची पार्श्वभूमी नसलेले मात्र समाजशिल व्यक्तिमत्त्व असलेलें तथा सामाजिक उपक्रमांना अग्रक्रम देणारे आनंदराव पाटील बिराजदार



गुरुजींचा तब्बल ३६ वर्ष प्रदीर्घ सेवा करुन निवासी मुकबधीर विद्यालयात निवृत्त झाले आहेत.

वर्ष १९८९ कालावधीत स्थापना करण्यात आलेली निवासी मुकबधीर विद्यालयाच्या आज घडीला भव्य वटवृक्षाच्या निर्मितीत आनंदराव पाटील बिराजदार गुरुजींचा संस्थाचालकासोबतच घारीचा वाटा होता. क्रियाशील कार्यतत्परता, प्रामाणिकपणा या गुणांमुळे सुपरिचित असलेल्या आनंदराव पाटील बिराजदार गुरुजींचा निरोप समारंभ म्हणजे मुकबधीर विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंदांचा छत्र हरवले सारखे झालेले आहे. असे मत शिक्षकांनी व्यक्त केले आहे.तर संस्थेचे सचिव बि.पी.नरोड यांनी पाटील गुरुजींच्या संस्थेच्या भरीव शैक्षणिक गुणवत्ता योगदानाबद्दल आभार माणुन पुढील यशस्वी जिवनासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. या वेळी मुख्याध्यापक अनंता भुसारे,, सहशिक्षक लतीफ पटेल, शिवाजी माने,अनंत पाटील,भरत मोकासे यांसह हंबर्डे गुरुजी, अशोक शिराळे, लक्ष्मणराव पापुलवार, गजानन सुर्यवंशी, फरहान,आदि उपस्थित होते.

# देवदत्त गुंडू याला यांचा सत्कार

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

मॉस्को(रशिया)येथे नुकत्याच झालेल्या वर्ल्ड रॉ पॉवरलिफ्टींग फेडरेशनच्यावतीने घेण्यात आलेल्या वर्ल्ड चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघाकडून खेळताना अहिल्यानगरचा खेळाडू देवदत्त गुंडू याने १२५ किलो हेवीवेट गटात रौप्यपदक पटकावले. या क्षेत्रात आजपर्यंत असलेली मॉस्कोची मक्तेदारी मोडीत काढून देवदत्त गुंडू याने देशाला पहिल्यांदाच रौप्यपदक मिळवून दिले आहे. आज नगरमध्ये आला असता त्याचा सन्मान करून तोफखाना येथे तोफखाना मित्र मंडळाचे अध्यक्ष सूरज जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी मोठ्या संख्रेने रहिवासी व मित्र मंडळ उपस्थित होते. अहिल्यानगर शहरात त्याचे जल्लोषात मिरवणुकीने स्वागत करण्यात आले.

# श्री व सौ.खरमाळे दांपत्यास मारुती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कार जाहीर

**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

अॅडव्हेंचर फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा 'मारुती चितमपल्ली निसर्गमित्र पुरस्कार' माजी सैनिक व निसर्ग संवर्धक रमेश खरमाळे व स्वाती खरमाळे या दांपत्यास ता:- जुन्नर यांना जाहीर झाला आहे.पर्यावरण आणि निसर्ग संवर्धनासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण कार्यक्रम शनिवारी दि:- १३ डिसेंबर रोजी सायंकाळी ०६ वाजता पुणे पर्वती येथील मित्र मंडळ चौकाजवळील श्री महालक्ष्मी सभागृहात प्रदान करण्यात येणार आहे.



हा पुरस्कार गोखले इन्स्टिट्यूट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्सच्या शाश्वत विकास केंद्राचे संचालक प्रा. गुरुदास नूलकर यांच्या हस्ते खरमाळे दांपत्याला प्रदान करण्यात येईल. सामाजिक वनीकरण विभाग पुणेचे प्रधान वनसंरक्षक विवेक खांडेकर हे उपस्थित राहणार असून, वनविभाग पुणेचे निवृत्त प्रधान वनसंरक्षक सुनील लिमये हे अध्यक्षस्थानी असणार आहेत.

रमेश खरमाळे यांनी आपली लष्करी सेवा पूर्ण करून निवृत्ती नंतर जुन्नर परिसरात निसर्ग संवर्धनाचे आणि रक्षणाचे कार्य हाती घेतले.गेली एक तपाहून अधिक काळ त्यांनी आपल्या पत्नी स्वाती खरमाळे यांच्यासह हजारो देशी वृक्षांची लागवड करत अनेक ऑक्सिजन पार्क म्हणजेच प्राणवायू निर्माण करणारी उद्याने विकसित केली आहेत.त्यांच्या याच कार्याबद्दल त्यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# वसईवाडी शाळेची खो खो स्पर्धेत नेत्रदिपक कामगिरी



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तळेरान येथील वसईवाडी या शाळेने सुरु असलेल्या यशवंतराव चव्हाण कला क्रीडा महोत्सव २०२५ अंतर्गत तालुका स्तरीय खो खो लहान गट- मुली प्रथम,मोठा गट- मुले द्वितीय,मोठा गट मुली- द्वितीय एकूण ३ गटात उल्लेखनीय कामगिरी केली आहे वसईवाडी संघाने सलग तिसऱ्या वर्षी अंतिम फेरीत प्रवेश मिळवून यशवंतराव कला क्रीडा महोत्सवात आपले एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले आहे.प्रतिकूल भौगोलिक वातावरण असल्याने अत्यंत दुर्गम,खडतर परिस्थिती- तून शाळेत येणारी ही मुले उपजतच काटक अन् मेहनती आहेत.चपळता, प्रसंगावधान तसेच अचूक निर्णयक्षमता हे महत्वाचे घटक असणारा खो खो हा खेळ या शाळेतील मुले अत्यंत खिलाडूवृत्तीने खेळतात. मुलांचा संपूर्ण वर्षभर सातत्याने वर्षभर घेतला जाणारा सराव,कठोर परिश्रम,खेळाबद्दल सकारात्मक दृष्टीकोन यांमुळेच आम्ही हे यश मिळवू शकलो.

# अहिल्यानगर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकामुळे ७६८ ग्रामपंचायत निवडणूका लांबणीवर!

**अहिल्यानगर : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका कोणत्या ना कोणत्या कारणाने लांबल्याचे दिसत आहे. यामुळे नगर जिल्ह्यात मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकाही लांबणीवर पडण्याची चिन्हे आहेत.

नववर्षात जिल्ह्यात मुदत संपणाऱ्या ७६९ व मागील दोन वर्षापासून प्रशासक असणाऱ्या आणि निवडणुकीची प्रतिक्षा असणाऱ्या ९९ अशा ७६८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका किमान सहा महिने लांबणीवर पडण्याची शक्यता जिल्हा प्रशासनाकडून वर्तवण्यात आली आहे.

जिल्ह्यातील २०२४-२५ वर्षातील रिक्त झालेल्या



ग्रामपंचायतीच्या निवडणुका आधी लोकसभा व त्यानंतर विधानसभा निवडणुकीमुळे लांबणीवर पडल्या.

सध्या मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर प्रशासकामार्फत कारभार सुरू आहे. आता त्यात नवीन वर्षात फेब्रुवारी २०२६ मध्ये जिल्हाभरातील ७६९ ग्रामपंचायतींची पाच वर्षांचा कार्यकाळ संपणार आहे. तेथे निर्धारित वेळेत नवे सदस्य निवडून येण्यासाठी डिसेंबर महिन्यातच ग्रामपंचायतींचा निवडणूक कार्यक्रम जाहीर होणे अपेक्षित आहे. परंतु सध्या नगर पालिका निवडणुकीची आणि त्यानंतर महापालिका व जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि महापालिकांच्या निवडणुकांची प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.या सर्व निवडणुका ३१ जानेवारीअखेर संपविण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

निवडणूक आयोगासाठी हा कालावधी अपुरा आहे. अशा स्थितीत ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकण्याशिवाय पर्याय नाही. त्यातच फेब्रुवारी महिन्यांत मुदत संपणाऱ्या बहुतांश ग्रामपंचायती दिग्गज नेत्यांच्या गावातील आहेत. त्यामुळे येथेही राजकीय संघर्ष अटीतटीचा असतो. सरपंच निवडही थेट मतदारांतून होणार असल्याने भावी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य याकडे रंगीत तालीम म्हणून पाहतात.

फेब्रुवारीतील निवडणुका लांबल्यास त्या आगामी किमान सहा ते आठ महिने घेता येणार नाहीत. मार्चपासून शाळा-महाविद्यालयांच्या परीक्षांचा हंगाम सुरू होतो. त्यामुळे निवडणुकीसाठी शाळांतील वर्गखोल्या आणि शिक्षक उपलब्ध होणार नाहीत. जूनपासून पावसाळा सुरू होतो. त्यामुळे निवडणुका पावसाळा संपल्यावर म्हणजे दसरा - दिवाळीतच घ्याव्या लागणार आहेत.

जानेवारी ते डिसेंबर २०२४ मध्ये मुदत संपलेल्या ८४ ग्रामपंचायतीचा प्रभाग रचना व मतदार याद्यांचा कार्यक्रम पूर्ण झाला होता. तसेच जानेवारी ते डिसेंबर २०२५ मधील मुदत संपलेल्या १४ ग्रामपंचायतीच्या देखील प्रभाग रचना कार्यक्रम जाहीर झाला होता.

त्यामुळे या ९९ ग्रामपंचायतीच्या निवडणुका अगोदर होतील. शिवाय काही ग्रामपंचायतीच्या सदस्यपदाच्या पोटनिवडणुका होणार आहेत. यानंतरच २०२६ मधील ७६८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका होण्याची शक्यता आहे.